बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक : बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार, दि.३ ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक६२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## सर्वोच्च न्यायालयात धाव

मुंबई :राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने अजित पवार यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विधानसभा निवडणुकीची तारीख या आठवड्यात जाहीर होऊ शकते. त्याआधीच शरद पवार यांनी अजित पवार यांची कोंडी करण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवारांच्या पक्षाने सर्वोच्च न्यायालयाकडे ही विनंती केली आहे की महाराष्ट्रातील निवडणुकीच्या आधी घड्याळ चिन्ह गोठवावं. हे चिन्ह अजित पवार यांच्या पक्षाला मिळू नये. सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. मात्र शरद पवारांच्या पक्षाच्या बाजूने निर्णय आला तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीची निवडणुकीत अडचण होणार आहे यात शंका नाही.शरद पवार यांच्या पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

# रिपाइंचा केजवर दावा!

## महायुतीने जास्त डोके लावू नये, नसता अन्य ठिकाणी फटका बसवू

### रिपाइंची २० जागांची मागणी केज, औरंगाबाद फिक्स

### आमची जागा न सोडल्यास राज्यात फटका बसवू?

### पत्रकार परिषद घेवून पप्पु कागदेंनी स्पष्ट केली भूमिका

### पप्पु कागदेंच्या शक्ती प्रदर्शनाने राजकीय गणिते होणार चेंज!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंने आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुक संदर्भात महायुतीकडे राज्यातल्या २० जागा मागितलेल्या आहेत. त्यामध्ये औरंगाबाद आणि बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदार संघावर आम्ही दावा केला आहे. केज मतदार संघ रिपाइंला सोडला तर अन्य मतदार संघात महायुतीला फायदा होईल अन्यथा मोठा फटका बसेल. रिपाइंमुळे महायुतीला नेहमीच फायदा झालेला आहे. पप्पू कागदे असेही म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत केज मतदार संघात आपले नाव लिस्टमध्ये होते. त्यामुळे ठोंबरे बाईचे नाव कट झाले मात्र अंतिम टप्प्यात काय ऍक्टिव्हिटीज झाल्या माहित नाही. त्यामुळे आपल्याला उमेदवारी मिळाली नाही. मात्र यावेळेस केज मतदार संघावर आम्ही दावा केला असून आमची भूमिका ठाम असणार आहे. असे स्पष्टीकरण युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी पत्रकार परिषदेत दिले. त्यामुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणाचे समीकरणे चेंज होणार आहेत.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात निवड झाली आहे. त्या निवडीबद्दल बीड रिपाइंकडून शनिवार (दि.५)ऑक्टोबर रोजी रामदास आठवले यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. त्या सत्कार सोहळ्याची माहिती देण्यासाठी बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे बुधवार (दि.२) ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पप्पू कागदे बोलत होते. या पत्रकार परिषदेला राजू जोगदंड, किसन तांगडे यांची उपस्थिती होती. यावेळी पप्पू कागदे म्हणाले केज मतदार संघात निवडणूक लढविण्यासाठी रिपाइं केंव्हाच कामाला लागलेली आहे. त्यामुळे महायुतीने याकडे जास्त लक्ष घालू नये.गेल्या वर्षी केजची जागा रिपाइंला सोडण्यात आली होती.मात्र ऐनवेळी राजकीय घडामोडी घडल्याने ही जागा मिळू शकली नाही. यावर्षीचे सामाजिक आणि राजकीय गणिते वेगळे आहेत.असेही पप्पू कागदे म्हणाले. एकंदरीत पप्पू कागदे यांच्या या निर्णयामुळे बीडचे चित्र पूर्णतः वेगळे असणार आहे. बीडमध्ये मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार घेण्यामागे त्यांची नक्कीच दूरदृष्टी असणार आहे. पप्पू कागदे यांना आणि रिपाइंला हलक्यात घेऊन चालणार नाही. दावा केलेल्या केज आणि औरंगाबाद मतदार संघ जर मिळाला नाही तर नक्कीच माहितीच्या निकालावर याचे दीर्घ परिणाम होणार आहेत. आंबेडकरी चळवळीतील जो पक्ष आणि उमेदवार सक्षम व खंबीर आहे. त्याच्या बाजूने आंबेडकरी समूह एकजुटीने उभा राहण्याचे संकेत आहेत. त्यामुळे केज मतदार संघात रिपाइंचा विजय नाकारता येणार नाही.

पान २ वर...

### सत्कार सोहळा अभूतपूर्व

बीड शहरामध्ये ररिपाइंकडून मंत्री रामदास आठवले यांचा ऐतिहासिक सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तत्पूर्वी मंत्री रामदास आठवले यांची राजुरीवेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक इथपर्यंत रॅली काढली जाणार आहे. रिपाइंचा हा सत्कार सोहळा अभूतपूर्व होणार असून निळे वादळ उसळणार आहे.

### ठोंबरेबाई म्हणत साधला निशाना

केज विधानसभा मतदार संघाच्या गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत आपले नाव लिस्टमध्ये होते. म्हणून ठोंबरे बाईचा पत्ता कट झाला होता. परंतु शेवटच्या क्षणाला कोर कमिटीच्या काही ऍक्टिव्हिटीज झाल्या. त्यामुळे आपल्याला उमेदवारी मिळाली नाही. मात्र या निवडणुकीत केज राखीव मतदार संघात आपण ठाम आहोत. त्याचबरोबर औरंगाबाद हा मतदार संघ देखील लढविण्यासाठी रिपाइं ठाम आहे.असे स्पष्टीकरण पप्पू कागदे यांनी दिले.

### गावा-गावात झाल्या बैठका

बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव ,आष्टी, केज, परळी, अंबाजोगाई, वडवणी शिरूर, धारूर या सर्व तालुक्यातील गावा-गावात तसेच बीड शहरातील दलित वस्त्यांमध्ये बैठकांचे आयोजन करून भव्य सत्कार सोहळ्याची जिल्हाभरात जय्यत तयारी करण्यात आली आहे.



## गावठी पिस्टल बाळगणे पडले महागात!

### वेलडन: स्थानिक गुन्हे शाखा-बीडची कामगिरी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था. गु.शा.बीड यांनी वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदशकन केले. त्यावरुन दिनांक ०१/१०/२०२४ रोजी स्थागुशा येथील पोह/अशोक दुबाले, यांना गुप्त बातमीदारा मार्फत इसम नामे शिव सुनिल खोसे रा. माळीवेस याचेकडे गावठी कट्टा असल्याची खबर मिळाली, सदर खबर पो.नि. श्री.उस्मान शेख, स्थागुशा बीड यांना कळवुन त्यांनी पान २ वर...

## राज्यसेवा परीक्षेची जाहिरात काढा

### रोहित पवार : अन्यथा आंदोलन करणार



पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारकडे मागणी केली आहे की त्यांनी राज्य सेवा परीक्षा लवकरात लवकर घ्यावी. ते म्हणाले, मला राज्य सरकारला विनंती करायची आहे की दरवर्षी लाखो तरुण-तरुणी स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. त्यांचे आई-वडील त्यांना मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरांमध्ये अभ्यास करण्यासाठी, परीक्षेची तयारी करण्यासाठी पाठवतात. तिथे राहणं या मुला-मुलींना परवडत नाही. तरी देखील त्यांचे आई-वडील त्यांची व्यवस्था करतात, शिक्षणाचा सर्व खर्च उचलतात. या मुला मुलींची एकच मागणी आहे की ऑब्जेक्टिव्ह टाईप पॅटर्न आता बंद होणार असल्यामुळे त्या परीक्षा आता वेळेवर व्हायला हव्यात. या तरुणी-तरुणींनी आतापर्यंत या पद्धतीने परीक्षा देण्याची तयारी केली आहे. त्यांनी अभ्यास पान २ वर...

## ...सदस्य बसला उपोषणास

### विजय बडे: कामे अंत्यत बोगस, निकृष्ट दर्जाची



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील रेवली येथे सन २०२१ ते २०२४ दरम्यान गावात झालेली सर्व कामे अंत्यत बोगस व निकृष्ट दर्जाची झाली आहेत, सदरील कामांची चौकशी करुन संबंधितांवर कडक कार्यवाही करावी या मागणी साठी रेवली ग्रामपंचायत सदस्य विजय सायसराव बडे काल दिनांक २ ऑक्टोंबर रोजी पासुन ग्रामपंचायत कार्यालय समोर अमरण उपोषणास बसले आहेत. या संबधिचे निवेदन मुख्य कार्यकारी पान २ वर...

## परतीच्या पावसाने शहरात उडाली दैना

### दिलासा : शिवसंग्रामने उठविला होता आवाज



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील विविध भागातील नागरिक, महिला यांना सोबतीला घेऊन विविध समस्ये संदर्भात बीड शहर शिवसंग्रामने शिष्टमंडळासह महिन्या पूर्वी मुख्यअधिकारी यांना निवेदन देत आंदोलन केले होते. याची दखल घेत नगरपालिकेने शिवसंग्रामच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या समस्या सोडवल्या असून बीड शहरातील शिंदे नगर, गिराम नगर भागात तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकून रस्त्याची दुरुस्ती केली आहे. मागील काही दिवसात सुरु झालेल्या परतीच्या पावसाने सर्वत्र पाणी आणि चिखलमय रस्ते पहावयास मिळाले परंतु ज्या भागातील नागरी समस्या संदर्भात शिवसंग्रामने आवाज उठवला होता. त्या पान २ वर...

## अजित पवार | दोन महिन्यांचे एकत्रच पैसे मिळणार

# लाडक्या बहिणींसाठी भावाची खुशखबर!



मुंबई /पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. यातच सध्या अनेक नेत्यांचे राज्यभरात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून महायुतीचे नेते सरकारने राबववलेल्या योजनांची माहिती सांगत आहे. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना जुलै पासून महिन्याला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली.

### किती तारखेला मिळणार पैसे?

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका सभेला संबोधित करताना सांगितलं की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी म्हणजे भाऊबीजेलाच बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहेत, असं अजित पवारांनी सांगितलं आहे.

राज्य सरकारने सर्वात आधी दोन महिन्यांचे एकत्र म्हणजे पान २ वर...

### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना आधी दोन महिन्यांचे तीन हजार दिले. त्यानंतर आता लाडक्या बहिणींना सप्टेंबर महिन्याचे पैसे दिले आहेत. मात्र, आज मी तुम्हाला सांगतो ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी दिवाळी भाऊबीजेची ओवाळणी बहिणींच्या खात्यावर जमा होणार आहे, हा शब्द मी तुम्हाला देतो, असं अजित पवार यांनी एका सभेत बोलताना म्हटलं आहे.



## राज्यमाता आणि गोठ्यातले आपण!

हा शाहू- फुले- आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढच्या काळात शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा- अलीकडचा लोकप्रिय राजकीय शब्दप्रयोग करायचा तर- आभाळभर ऋणी राहील. या ऋणातून उतराई कसे व्हावे हे पुढच्या कित्येक पिढ्यांना कळणार नाही; इतके हे ऋण मोठे आहे. त्याचा संबंध या शंकराचार्यांनी आधी 'मातोश्री'वर पायधूळ झाडून, तेथील पाहुणचार झोडून, पोटभर आशीर्वाद देऊन नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही तसेच आशीर्वाद दिले या त्यांच्या धार्मिक चातुर्याशी अजिबात नाही. असे सर्व डगरींवर एकाच वेळी पाय रोवून उभे राहता येणे यालाच अध्यात्म असे म्हणत असावेत. आणि असेही आत्मा एक आहे, असे म्हणतातच. तेव्हा 'मातोश्री'वर केलेली आशीर्वादवर्षा 'वर्षा'वासीयावरही केली तर कुठे बिघडते असाही स्थूलातून सूक्ष्मात जाणारा विचार शंकराचार्यांनी केला असणार. या ऋणाचा संबंध आपणास आणखी एक शंकराचार्य प्राप्त झाले, या आनंदवार्तेशीही नाही. पूर्वीच्या काळी या भारतवर्षात तीन आणि एक अर्धा इतकेच शंकराचार्य असत. हे अर्थातच पं. नेहरूंचे पाप. त्यांनी आयआयटी, आयआयएम, एम्स यांचा पुरेसा विस्तार केलाच नाही. त्यामुळे फक्त मूठभरांनाच त्याचा लाभ झाला. हे मूठभर त्यामुळे कायम पं. नेहरूंचा जप करीत बसतात. शंकराचार्यांबाबतही त्यांनी असाच हात आखडता घेतला असावा. काही का असेना, त्यातून त्यांचा हिंदुद्वेषच दिसून येतो. या देशाचा, हिंदूंचा आकार लक्षात घेता अधिकाधिक शंकराचार्यांची आपणास गरज होती. ती गेली दहा वर्षे यथासांग पूर्ण होताना दिसते. त्याचाच एक भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर शंकराचार्य निर्मिती आपल्या देशात सुरू आहे. खरे तर 'एक जिल्हा, एक शंकराचार्य' अशी योजनाच हाती घ्यायला हवी. तसे झाल्यास हिंदूंचा उद्धार झालाच म्हणून समजा. तथापि तो होईपर्यंत सध्या उपलब्ध असलेल्या शंकराचार्यांवर आपणास भागवून घ्यावे लागेल. तूर्त त्यांनी आपणावर केलेल्या उपकारांविषयीते आहेत गोमातेस 'राज्यमाता' दर्जा देण्याच्या त्यांच्या सूचनेबद्दल. या राज्यातील नव्हे तर समग्र देश आणि खरे तर पृथ्वीवरील गोधन यामुळे खूश झाले असून त्यांच्या सुमधुर हंबरड्याने आसमंत कसा भरून गेला आहे. यामुळे मेनका गांधींसह सर्वच प्राणीप्रेमींस आनंद अनावर झाला असून तो कसा व्यक्त करावा हे न कळून रस्त्यारस्त्यांवर कोणा गोप्रेमीने पुण्यसंचयासाठी भरवलेल्या फरसाण-गाठ्यांचा रवंथ करीत बसलेल्या, हाडे वर आलेल्या राज्यमातांचा शोध घेण्यासाठी झुंडीच्या झुंडी घराबाहेर पडल्या आहेत. गोमातेस 'राज्यमाता' जाहीर करा हा अत्यंत बुद्धिजन्य, पंडिती, प्रज्ञावान इत्यादी सल्ला निवडणुकेच्छू एकनाथरावांस साक्षात शंकराचार्यांनी दिला. धर्मरक्षक, धर्मप्रेमी आणि धर्मवीरांचे अनुयायी एकनाथराव हा शंकराचार्यांचा शब्द खाली कसा पडू देतील? त्यांनी ताबडतोब मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडला आणि त्यास नवे गोप्रतिपालक अजितदादा पवार यांनी त्वरेने अनुमोदन दिले. जुने गोप्रतिपालक देवेंद्र ऊर्फ देवाभाऊ यांनी हे श्रेय घेऊ नये यासाठी अजितदादांनी दाखवलेली चपळाई अगदी नोंद घ्यावी अशी. गोमातेचे प्रेमच असे आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मुद्दा मंजूर होणे हा उपचार ठरला. लगेच सरकारी अध्यादेश निघाला. 'राज्यमाता' असे शिक्कामोर्तब गायीगायींवर झालेही. सुरुवातीस थोडा विलंब झाला तो 'राज्यमाता' की 'राजमाता' या शब्दच्छलाचा गुंता सुटेपर्यंत. अखेर 'राज्यमाता' हा शब्दप्रयोग उचित असल्याचे प्रमाणपत्र अलीकडचे वैय्याकरणी संजय शिरसाट आणि तत्समांनी दिल्यानंतर सरकारी आदेश प्रसृत झाला म्हणतात.फक्त कोणी आता 'राज्यपिता कोण' हा प्रश्न तेवढा उपस्थित करू नये. प्रत्येक 'मातेस' एक भिन्नलिंगी साथीदार असल्याखेरीज तूर्त तरी प्रजोत्पादन होऊ शकत नाही, हे खरे असले तरी उभयतांतील 'संबंध' हे क्षणिक असतात असे साक्षात आचार्य अत्रे यांनीच सांगून ठेवलेले आहे. (पाहा : स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळची माता असते.) तेव्हा राज्यपिता कोण हा प्रश्न अयोग्य. हे असले क्षुद्र मुद्दे विसरून आपण सर्व जण गायींस राज्यमातेचा दर्जा देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करू या आणि हा दर्जा देता यावा म्हणून या राज्याची अवस्था जणू गोठा अशी केली याबद्दल सरकारचे आभार मानू या.

# दबंग कामगिरी करणारे सिंघम अधिकारी

## वेलडन: तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि सोमनाथ नरके धडाकेबाज

आल्ताफ कुरेशी/तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन येथे नऊ महिन्यांपासून रूजू झालेले सपोनि सोमनाथ नरके तलवाडा पोलीस स्टेशनला खमक्या अधिकारी लाभल्याने पोलिस स्टेशन ६५ गावात जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढल्याने सर्व सामान्य माणसांना विश्वासात घेऊन काम करणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. सपोनि सोमनाथ नरके हे मुपो टाकळी तालुका पैठण जि छत्रपती संभाजी नगर येथील आहेत. नरके यांचे शिक्षण पैठण येथे झाले आहे. २०१४ मध्ये पहिली पोस्टींग मुंबई येथील पायधुनी पोलीस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांनर मुंबईहून बदली बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुका ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तीन वर्ष काम केले. त्यानंतर अंबड तालुका पोलिस स्टेशन येथे दोन वर्षे काम केले आहे. उपनिरीक्षक पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती



झाली, दोन वर्ष आष्टी पोलिस स्टेशन येथे काम पाहिले व घनसावंगी पोलिस स्टेशन झाल्यानंतर तलवाडा पोलीस स्टेशन येथे नऊ महिन्यांपासून रूजू झाल्या पासून तलवाड्यात कायदा व्यवस्था अबाधित रहावे व सर्व समाज बांधवांना एकत्रित घेऊन शांततेत प्रत्येक सण उत्सव साजरे झाले पाहिजे, या उद्देशाने आजपर्यंत तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील गावात शांततेत महापुरुषाची जयंती व सर्व सण शांततेत साजरे झाले आहे.

मुपो पोस्ट टाकळी तालुका पैठण, जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील सर्व सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील सोमनाथ नरके, यांचे उच्च माध्यमिक शिक्षण पाथर्डी येथे झाले तर उच्च शिक्षण पैठण तालुका येथे पूर्ण केले. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी अभ्यासात लक्ष देऊन मन तन लावून शिक्षण पूर्ण केले अखेर यश मिळाले. त्यांच्या कुटुंबात एक भाऊ, एक बहीण वडील आई, पत्नी असा परिवार आहे.

मुपो पोस्ट टाकळी तालुका पैठण, जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील सर्व सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील सोमनाथ नरके, यांचे उच्च माध्यमिक शिक्षण पाथर्डी येथे झाले तर उच्च शिक्षण पैठण तालुका येथे पूर्ण केले. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी अभ्यासात लक्ष देऊन मन तन लावून शिक्षण पूर्ण केले अखेर यश मिळाले. त्यांच्या कुटुंबात एक भाऊ, एक बहीण वडील आई, पत्नी असा परिवार आहे.


**कारवाईचा सपाटा:** तलवाडा पोलीस स्टेशन येथे सोमनाथ नरके नऊ महिन्यापासून रुजू झाल्यापासून अवैध देशी दारू वर ८८ गुन्हे दाखल चार लाख पंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल दारूचा जप्त करण्यात आला अवैधरीत्या वाळूचे दहा गुन्हे दाखल अंदाजे ५५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तिरट नावाचे जुगार २१ गुन्हे दाखल दीड लाख रुपये अंदाजे मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच गांज्याच्या संदर्भात एक गुन्हा दाखल ,९२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, गुटक्या वर एक गुन्हा दाखल एकूण मुद्देमाल अंदाजे २७००० रूपयांचा मुद्दे माल जप्त करण्यात आला होता.सन २०२१,२०२२,२०२३, तुलनेत जुगारावर, मटका, देशी विदेशी दारू, गांजा, या तुलनेत नऊ महिन्यांत मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत

# भारत लवकरच महाशक्ती बनेल!

## देशविदेश: माजी पंतप्रधानांच मोठं भाकित

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत गेल्या काही वर्षात जगात महत्त्वाचा देश बनला आहे. भारताकडे आता जगातील देश मोठ्या आशेने बघतात. यादरम्यान आता ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी २०५० पर्यंत अमेरिकेशिवाय भारत आणि चीन हे दोन देश देखील जगातील महासत्ता बनतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. ब्लेअर म्हणाले की चीन, भारत आणि अमेरिका हे तीन देश महासत्ता म्हणून उदयास आल्याने एक जटिल जागतिक व्यवस्था निर्माण होईल. त्यावर मात करण्यासाठी जागतिक नेत्यांना तयार राहावे लागेल. एका मुलाखतीत ते म्हणाले की, भारत लवकरच महासत्ता बनणार आहे.टोनी ब्लेअर म्हणाले की, 'येत्या काळात जग वेगळ्या पद्धतीने बदलत जाणार आहे. पण तीन देश महासत्ता होण्याचा मार्गावर आहेत. ज्यामध्ये चीन, अमेरिका आणि भारत या तीन देशांचा समावेळ आहे, एक देश म्हणून तुमच्या बाजुने कोण कोण आहेत आणि तुमच्यासोबत किती देशांना जुळवून घ्यायचे आहे यावर तुमचं महत्त्व ठरतं. असे ही ते म्हणाले.



### इस्त्रायल -हिजबुल्लाह संघर्ष

इस्त्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील संघर्षाच्या वाढत्या धोक्याबद्दल ब्लेअर म्हणाले की, 'इस्त्रायलच्या उत्तरेत जे काही घडत आहे त्यामुळे संघर्ष वाढण्याची शक्यता आहे, ही एक धोकादायक परिस्थिती आहे. त्याचे समाधान आवश्यक आहे. यासाठी इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यात शांततेचा एकच व्यवहार्य मार्ग आहे आणि तो म्हणजे द्विराज्य सिद्धांत.पश्चिम आशियात जे काही चालले आहे ते संपवण्यात चीन महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे ब्लेअर यांचे मत आहे. शांतता चर्चेत चीन महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे ते म्हणाले. चीनने आपला मित्र इराणला संघर्ष थांबवायला सांगावे. संघर्ष वाढून दोन्ही बाजूंना फायदा होणार नाही.

टोनी ब्लेअर हे १९९७ ते २००७ पर्यंत ब्रिटनचे पंतप्रधान होते. ते पुढे म्हणतात की, सध्याची जागतिक परिस्थिती खूपच गुंतागुंतीची बनली आहे. मी पंतप्रधान होतो तेव्हा अमेरिका हा एकमेव मुख्य महासत्ता देश होता. पण आता चीन आणि भारत नवीन महासत्ता म्हणून उदयास येत आहेत. यासाठी इतर देशांना मुत्सद्दी रणनीतींचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला एक मजबूत युती तयार करावी लागेल, जी या तिन्ही महासत्तांशी समान पातळीवर बोलू शकेल.

# सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महात्मा गांधी यांची १५५ वी जयंती व लालबहादूर शास्त्री यांची १२० वी जयंती येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यानंतर सर्वांना तंबाखू मुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली.

## पान एक वरून

### रिपाइंचा केजवर दावा

दरम्यान भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाली. त्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळा बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर शनिवार (दि.५ ) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्यास राजा सरवदे, अविनाश महातेकर, बाबुराव कदम, गौतम सोनवणे, दौलत खरात, अड ब्रह्मानंद घव्हाण, मिलिंद शेळके, परशुराम वाडेकर, चंद्रकांत चिकटे, श्रीकांत भालेराव, सिद्धार्थ कासारे, डॉ. विजय मोरे, डॉ. सिद्धार्थ भालेराव, सचिन मोहिते, विजय सोनवणे, भास्कर रोडे आदी रिपाइं नेते उपस्थित राहणार आहेत.

### गावठी पिस्टल बाळगणे

पोउपनि मुरकुटे यांचे पथकास कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोउपनि मुरकुटे यांनी पथकासह सदर इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली , जालना रोडवरील मिलन बिअरबार समोर असल्याची माहिती मिळाली तेव्हा सापळा लावुन इसम नामे शिव सुनिल खोसे रा. मलिवेस बीड यास शिताफीते पकडुन त्याचेजवळ अवैधरित्या एक गावठी बनावटीची पिस्टल व एक जिवंत राऊंडसह मिळुन आला आहे. सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द सरकार तर्फे पोह/मनोज वाघ यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे.बीड ग्रामीण येथे कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस असा एकुण किंमती ४१,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/तुळशिराम जगताप,पोह/अशोक दुबाले, पोह/कैलास ठोंबरे, मनोज वाघ, राहुल शिंदे, पोना/विकास वाघमारे, पोशि/नारायण कोरडे, यांनी केली आहे.

### राज्यसेवा परीक्षेची जाहिरात

केला आहे. त्या परीक्षा आता वेळेवर व्हायला हव्यात. पवार म्हणाले, राज्यसेवेच्या जागा देखील यंदा कमी आहेत. ४५० च्या आसपास जागा निघाल्या आहेत. एकूण ३५ विभाग असून सरकारने केवळ १८ विभागातील पदांची भरती होणार आहे. मग उर्वरित १७ जागांचं काय? उपअधीक्षक पदाची एकही जागा काढलेली नाही. उपायुक्तांच्या केवळ सहा जागा आहेत. बिहारने तहसीलदार पदासाठी १३६ जागांवर भरती काढली आहे. तर, उपअधीक्षकपदांच्या २०० जागा काढल्या आहेत. याबाबत बिहारदेखील आपल्या पुढे आहे आणि आपण खूप पिछाडीवर आहोत. त्यामुळे मी राज्य सरकारला विनंती करतो की त्यांनी लवकरात लवकर या जागा काढायला हव्यात. तसं मागणीपत्र जायला हवं.पवार यांनी एक्सवर यासंदर्भात एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की यंदाची राज्यसेवा परीक्षा ऑब्जेक्टिव्ह (बहुपर्यायी) पद्धतीची शेवटची परीक्षा असल्याने यंदाच्या परीक्षेत सर्वच ३५ संवार्गांचा समावेश करून पोलीस उपअधीक्षक, तहसीलदार यांसारख्या सर्वच पदांची मोठी जाहिरात असावी, तसेच संयुक्त (कंबाईन) परीक्षेची जाहिरात भरघोस पदांसह लवकरात लवकर म्हणजे आचारसंहितेच्या अगोदर काढावी, या विद्यार्थ्यांच्या मागण्या आहेत. विद्यार्थी सरकारकडे यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करत असताना देखील सरकार मात्र हा विषय डएठखजणड पणे घेत नाही, सरकारने विद्यार्थ्यांचा अंत न पाहता सकारात्मक विचार करून निर्णय घ्यावा अन्यथा लवकरच रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

### परतीच्या पावसाने शहरात

ठिकाणच्या रस्त्याची दुरुस्ती झाल्याने या परिसरातील नागरिकांना परतीच्या पावसामुळे शहरातील अन्यत्र झालेल्या गैरसोयीचा सामना करावा लागला नाही. शिवसंग्राम ने केलेल्या या आंदोलनामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे या भागातील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. रस्त्यांची शहरात एवढ्या समस्या असताना मुख्याधिकाऱ्यांना नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी वेळ नाही का? असे म्हणत घोषणाबाजी करत शिष्टमंडळाने मुख्याधिकारी यांच्या कार्यालयातच ठिय्या आंदोलन केल होते. यानंतर नगरपालिकेत शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी नगरपालिकेत पाचारण करत मुख्याधिकारी यांना नागरिकांच्या समस्या संदर्भात धारेवर धरले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून नगरपालिकेने शिवसंग्रामच्या शिष्टमंडळाने सुचवलेल्या समस्या सोडवल्या असून या भागातील नागरिकांना चिखलमय रस्त्यातून प्रवास करण्याची वेळ आली नाही. त्यामुळे नागरिक शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांचे आभार मानत, समाधान व्यक्त केले आहे.

### ...सदस्य बसला उपोषणास

अधिकारी बीड यांना २७ सप्टेंबर रोजी देण्यात आले आहे . ह्या निवेदनात म्हणटले आहे कि,गावात व गाव अंतर्गत असणारी कामे बोगस पण करुन बिले उचलली आहेत, बोगस कामा बाबत संबंधित अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देत सुचना केल्या परंतु कसलीही दखल घेतल्या गेली नाही. म्हणून अखेर लोकशाही मार्गाचा अवलंब करत ग्रामपंचायत सदस्य विजय बडे अंदोलनास बसले आहेत.

### लाडक्या बहिणींसाठी

जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे मिळून महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा केले होते. त्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहेत. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहिणींना अजून एक मोठी खुशखबर दिली आहे. लाडक्या बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्यांचे पैसे खात्यावर जमा होणार असून नोव्हेंबर महिन्यांचे पैसे देखील ऑक्टोबरमध्येच म्हणजे दिवाळीलाच जमा होणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

## पान सहा वरून

### मोहन ये बात कुछ

काय आदर्श घ्यावा आणि कसे तुम्हाला लोकप्रतिनिधी म्हणून निवडावे असाच सवाल च मतदार माता भगणी उपस्थित करत आहेत.आमदार व्हावे वाटणे चुकीचे नाही पण चर्चेत राहण्यासाठी वाटेल ते बोलणे मात्र चुकीचे आहे राजकारणात वक्तृत्व हे माणसाला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवते त्याचा वापर कसा आणि कुठे करायचा याची पण जाण असणे आवश्यक असते.याच बीड जिल्ह्यातील स्व.प्रमोद महाजन हे केवळ वक्तृत्व च्या जोरावर देश पातळीवर नेतृत्व देत होते हा आदर्श काही लांबचा नाही अत्यंत खालच्या स्तराच्या बोलण्याने मात्र जगताप यांनी आपलेच मतदार नाराज केले आहेत.

### महापुरुषांचा अवमान तरीही

कार्यवाही न करता त्यांना पाठीशी घालत असल्यामुळे मी एक अनुसूचित जातीचा दलित व्यक्ती असल्यामुळे माझ्या अर्जाची दाख्खल घेत नाही म्हणून माझ्या तोर्व भावना दुखावलेल्या असल्यामुळे माझे वय ७५ वर्षे असून सुद्धा लाक्षणिक उपोषण मला करण्याची माझ्यावर वेळ शहर पोलिस स्टेशनने आणली आहे. त्यामुळे महात्मा गांधी जयंतीचे अवचीत्य साधून लाक्षणिक उपोषण करणार आहे याची जवाबदारी सर्वश्री प्रशासनावर राहील असे निवेदनाद्वारे म्हटले आहे.

### ...नसता उमेदवारांना

कल्याण केलं आहे. त्यामुळे महामानवाच्या नावास पाठिंबा दर्शवून आंबेडकरी जनतेच्या मागणी सोबत खंबीरपणे उभा रहावे. अशी मागणी प्रशांत वासनिक यांनी केली आहे. दरम्यान येत्या ९ ऑक्टोबर रोजी बीडमध्ये भव्य मोर्चाचे आयोजन केले जाणार आहे. या मोर्चामध्ये बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेने जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन प्रशांत वासनिक यांनी केले आहे.

### गेवराई विकासात आ.आण्णांचे

नंदु गरड, लक्ष्मण हाजारे,सुखदेव गरड,बाबुराव धुमक,मच्छिंद्र धुमक,विजय तुपे,किसन बावस्कर, राजेंद्र गोजारे,कचरु चौधरी,दत्ता गोजारे,सोमेश्वर तुपे, बाळु चौधरी,सचिन धुमक,संदिप गोजारे,गणेश चिकणे,राम गोजारे,गणेश तरांगे,ज्ञानेश्वर थोटे,प्रल्हाद तरगे,युवराज हिवरे,संदिपान,थोटे,संतोष गोजारे,गणेश चौधरी,कृष्णा थोरात, राम येवले,शिवाजी जाधव, दादासाहेब गरड,श्याम कुसकर,शुभम थोटे,सचिन थोटे,गणेश थोटे,हनुमान रुपनर,कल्याण चौधरी आदी उपस्थित होते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तसे अर्थसंकल्प योजनेंतर्गत गेवराई तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मादळमोही ते शहाजनपुर ५/६०० कि.मी.४ कोटी १२ लक्ष ३५ हाजार रूपये निधीचा रस्ता, रा.म.मा.६१ खडकी,मनकापुर रस्ता ५/५०० ३ कोटी ९२ लक्ष ९ हाजार रूपये किमंतीच्या रस्ता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा ६१ तळेवाडी ते वडगावढोक ३/५०० कि.मी. ४ कोटी ९२ लक्ष ३४ हाजार रूपये निधीच्या रस्ता, अर्थसंकल्प २०,२३,२४, योजनेंतर्गत गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्ता कामांचे उद्धाटन करण्यात आले आहे यावेळी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते

### जरंडीत स्वच्छता अभियान

पाटील सदस्य वंदना पाटील यांच्या हस्ते या पंधरवडा चा समारोप करण्यात आला यावेळी सदस्य मधुकर पाटील, मधुकर सोनवणे, राजेंद्र पाटील,दिलीप पाटील. सुधाकर चौधरी,अमृत राठोड, कर्मचारी संतोष पाटील,सतीश बाविस्कर,अंबु राठोड, आदींची उपस्थिती होती.

### बीड रेल्वे स्टेशनला बाबासाहेबांचेच

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव देण्यात यावे अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने करण्यात आली.यावेळी सुभाष बांगर, किशोर भोले, प्रदिप शिंदे, नवनाथ त्रिभुवन, राहुल त्रिभुवन, विकास बनसोडे, ज्ञानेश्वर हवाले, किशोर चव्हाण, सचिन वाव्हळ, कृष्णा हातागळे, विजय डोंगरे, नितिन खापरे, माही कापसे, दादासाहेब खापरे, शिवाजी केदार, काळेंसह शेकडो कार्यकर्ते अवर्जून उपस्थित होते.

### भक्तांकडून रस्ता दुरुस्तीची

.वर्षभर पुजाअर्चा व देखभाल करतात. नवरात्रीच्या पुर्वसंध्येला लोकवर्गणीतून मंदिराची रंगरंगोटी करुन या मंदिरात घटस्थापना करण्यात येते. दसऱ्याच्या दिवशी होम केला जातो. इतर दैनंदिन वेळेत दिवसातून दोनदा देवीची आरतीसह धार्मिक कार्यक्रम होतात. मंदिरात सध्या नवरात्रीमुळे दर्शनासाठी भाविक गर्दी करतात. परंतू देवीच्या दर्शनासाठी जाण्याची वाट मात्र भाविकांसाठी खडतर झाल्यामुळे साक्षात देवीलाच भक्तांकडून रस्ता दुरुस्तीची आस लागली म्हणावी लागेल.

### संगणक जीवनाचा अविभाज्य

ठिकठिकाणी संगणक वापरले जात असल्याने संगणक साक्षर होणे काळाची गरज असल्याचे यादव यांनी सांगीतले. याप्रसंगी नगराध्यक्ष मिर्झा झिया बेग, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, गुलाम हाफिज, मौलाना उमर, शिवाजी आव्हाड, शेख जुनेद, मनोज यादव यांच्यासह संजय भोकरे, पोले, बनकर, शिंदे, आजबे, विश्वकर्मा, शेख मुजाहिद आदी मान्यवर उपस्थित होते.

### तंबाखू वेसनमुक्तीचा

नेते श्रीराम कुटे,जि.प.उच्च प्रा.शा.जिवाची वाडी शाळा व्यावस्थापन समितीचे अध्यक्ष माऊली चौरे,मोकींदा चौरे,ग्रंथपाल सुभाष सारूक, श्रीमती शोभाताई चौरे शाळेतील विधार्थी इत्यादी उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# लाडक्या बहिणींनी फिरवली पाठ!

## बोंबला — परळीकडे बस गाड्या गेल्या रिकाम्याच

सिरसाळ/पुण्यभूमी प्रतिनिधी

लाभ आणि बळ हे ब्रीद घेऊन अजित पवार व त्यांचे पक्ष पदाधिकारी राज्यभर जन सन्मान यात्रेच्या माध्यमातून मेळावे घेत महिलांशी संवाद साधत आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेन महिलांचे सशिक्तीकरण करणारी योजना आहे व या योजने मुळे महिलांना आर्थीक बळ मिळाले, म्हणून या योजनेच्या निमित्ताने अजित पवार यांची जन सन्मान यात्रा सुरु आहे.परंतु परळी येथे झालेल्या कार्यक्रमास महिलांचा अल्प प्रतिसाद होता,सिरसाळा व परिसरातील गावातील महिलांनी तर ह्या कार्यक्रमास पाठच फिरवली आहे . सिरसाळ्यात पाठवलेल्या अनेक बस गाड्या रिकाम्याच वापस गेल्या, ज्या काही गाडीत महिला गेल्या त्या गाड्या पण अर्ध्या रिकाम्याच होत्या. सिरसाळा परिसरातील खेडेगावात देखील अशीच परिस्थिती दिसुन आली , गावोगावी दिलेल्या भरल्याच नाहीत, काही बस गाड्यात १५/२० अशी महिलांची संख्या होती .पक्ष




कार्यकर्ते नियोजनासाठी धडपड करत होतेच परंतु शासकीय आदेशानुसार शिक्षक मंडळी, इतर प्रशासकीय कर्मचारी हे देखील नियोजनात होते. सर्व यंत्रणा कामाला असतांना देखील परळी तालुक्यातील सिरसाळा व परिसरातील गावात जन सन्मान यात्रा कार्यक्रमा बाबत महिलां व नागरिकां मध्ये उदासीनता दिसुन आली .

### महिला सोयाबीन काढणीला व दसरा काढण्यात व्यस्त

सद्या सोयाबीन काढणीस आली आहे , पर बॅग ५ ते ६ हजार रुपये दर मिळत आहे, हा दर परवडणारा आहे. म्हणून कार्यक्रमाला जाण्या पेक्षा अनेक महिला सोयाबीन काढण्यास गेल्या तर आता नवरात्री व दसरा असल्याने या निमित्त घरातील दसरा काढण्यात अनेक महिला व्यस्त आहेत. कदाचित या कारणा मुळे देखील महिला जन सन्मान कार्यक्रमास जाऊ शकल्या नसतील.

# सुंदरराव सोळंके कारखान्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तेलगाव येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यात दि ०२ ऑक्टोबर बुधवार रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली.तेलगाव येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना कार्यालयात कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस कारखाना सचिव सुरेश लगड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी अशोक पाटील, राजेश देशमुख, दासराव मोरे,पंडित शिंदे,दिगांबर विर, दत्ता शेवाळे आदिसह कामगार, कर्मचारी उपस्थित होते.

# तेली समाजाकडून दांडिया महोत्सव

## पवन फुटके:महिलांसाठी स्पर्धांचे आयोजन



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील तेली समाजाच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून नवरात्री निमित्त तेली समाज सार्वजनिक दांडीया उत्सव समितीच्या वतीने दांडीया उत्सवाचे आयोजन करण्यात येत असून यावर्षीही दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया सोबत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच भव्य आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आल्याची माहिती तेली समाज सार्वजनिक दांडीया उत्सव समितीचे अध्यक्ष पवन फुटके यांनी दिली आहे.

येथील श्री. वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री.शनि मंदिरात तेली समाजाच्या वतीने नवरात्री निमित्त तेली समाज सार्वजनिक दांडीया उत्सव समितीच्या वतीने सलग तिसऱ्यावर्षी दांडीया उत्सव २०२४ चे आयोजन ०४ ते ११ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले आहे. या महोत्सवात महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आले आहेत. यामध्ये फ्रिज, ओव्हन, डिजिटल वॉच आदी आकर्षक बक्षिसे दांडिया सोबत मिळवण्याची संधी महिलांना मिळणार आहे. दांडिया महोत्सवाचे उद्घाटन लाडकी बहिण योजनेचे परळी विधानसभा अध्यक्ष वाल्मिक आण्णा कराड व शिक्षणाधिकारी (जालना) मंगल धुपे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (ता.०४) रोजी होणार आहे.तर बक्षीस वितरण शुक्रवारी (ता.११) राजश्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी समाजातील सर्व महिला भगिनींनी या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष पवन फुटके, राधा फकिरे, सुजाता फुटके, मोहन राजमाने, अतुल बेंडें, सोमनाथ वाघमारे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतिष फुटके, अशोक रोकडे, राहुल क्षिरसागर गजानन बेंडे, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, दिपक साखरे, सुनील क्षिरसागर, ईश्वर जठार, प्रकाश नखाते, प्रसाद जठार यांच्यासह समितीच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

# बी.व्ही. गोपाळघरे यांचे निधन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज शहरातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेच्या पायाभरणीत महत्वाचे योगदान आहे ते या शाळेचे संस्थापक शिक्षक-मुख्याध्यापक होते. ज्या शिक्षकांनी शाळेच्या उभारणीत मोठे योगदान दिले त्यात त्यांचे नांव अग्रभागी होते गेली तीन दशके त्यांनी या शाळेत अध्यापन केले. एवढी मोठया शाळेचे व्यवस्थापन त्यांनी समर्थपणे पेलले. दोन वर्षांपूर्वीच ते या शाळेच्या मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले होते. सध्या त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांना काल प्रकृती ठीक नसल्याने आंबेजोगाईच्या रुग्णालयात दाखल केले होते. आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. ते ६३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्यावर आज सायंकाळी ४ वाजता त्यांच्या होळ (ता केज) या जन्मगावी शेतात अंत्यसंस्कार पार पडणार आहेत. बी व्ही गोपाळघरे सरांना केजच्या शिक्षण क्षेत्र, सर्व विद्यार्थी-पालक व केजवासीयांची भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

# साबला येथे सन्मान सोहळा उत्साहात!

## अभिवादन: संयुक्त जयंती उत्सव साजरा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे साबला ग्रामपंचायत कार्यालयात शांतीचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत अधिकारी धनराज सोनवणे , आदर्श शिक्षक नरहरी काकडे , माजी पोलिस उपनिरिक्षक उमाशंकर शिंदे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , मुख्यमंत्री युवा दुत पवन काकडे , लक्ष्मण काकडे यांच्या हस्ते करण्यात आले . तसेच यावेळी महाराष्ट्र शासन मुंबई , जिल्हा परिषद , बीड , पंचायत समिती , केज . यांच्या आदेशान्वये स्वच्छ माझे आंगण या स्पर्धेतील स्पर्धकांचा सन्मान करून त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले . यामध्ये प्रथम क्रमांक कु . शुभांगी भगिरथ काकडे , द्वितीय क्रमांक



कु . सुप्रिया दत्तात्रय परळकर , तृतीय क्रमांक श्रीमती पुजा ज्ञानेश्वर पांचाळ यांचा सन्मान करून त्यांना माजी पोलिस उपनिरिक्षक उमाशंकर शिंदे यांच्या वतीने प्रथम बक्षीस ५०१ रुपये , द्वितीय बक्षीस ३०१ रुपये , तृतीय बक्षीस २५१ रुपये देण्यात आले . याच बरोबर ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी श्रीमान गुलाबराव मुळे , श्रीमान विश्वनाथ नाईकनवरे , श्रीमती कमलबाई संदिपान सरवदे , श्रीमती सरस्वती अशोक पांचाळ यांचाही सन्मान ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने ग्रामपंचायत अधिकारी धनराज सोनवणे व आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या हस्ते करण्यात आला स्वच्छ माझे आंगण या स्पर्धेत गावातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता . सध्या शेतातील मशागतीचे काम कोणाची सोयाबीन काढणी , मळणी , शेतातील गवत कापणी , पेरणी अशाप्रकारची वेरावेगळी कामे चालू असतानाही त्यांनी आपल्या गावासाठी आपणही काही केले पाहिजे या विचाराने या स्वच्छ माझे आंगण या स्पर्धेत सहभाग घेतलेल्या बद्दल सर्व स्पर्धकांचे व गावातील जनतेचे आभार . यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने मानण्यात आले .

# केज शहरामध्ये पसरली शोककळा!

## दुःखद घटना घडल्याने गहिवरले केज

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरामध्ये बप्पा या नावाने प्रसिद्ध असलेले युवक नेतृत्व सुमेध शिंदे यांचें आज हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले तसेच केज शहरातील प्रतिष्ठित व्यक्तीमत्व व हिरो शोरुमचे मालक आणि आप्पा नावाने प्रसिद्ध असलेले किशोर शेटे यांचे अपघाती निधन झाले. या दोन्ही अप्रिय घटनांनी केज शहर आणि परिसरात शोककळा पसरली आहे.केज शहरातील सुमेध शिंदे हे नगरसेविका पद्मिनबाई शिंदे यांचे चिरंजीव आहेत. शहरामध्ये बप्पा नावाने ते प्रसिद्ध होते. त्यांचा मोठ्ठा मित्रपरिवार होता. आज अचानक त्यांचे हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले यामुळे शहरामध्ये व परिसरात मोठी शोककळा पसरली आहे. याप्रमाणेच केज मधिल हिरो शोरुमचे मालक किशोर शेटे आप्पा यांचा अपघात केज कळंब रस्त्यावर माऊली सिनेमा गृहाजवळ झाला. या घटनेत ते मृत्यूमुखी पडले आहेत. बीड जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष देवेंद्र शेटे यांचे ते बंधू आहेत. या दोन्ही घटनांनी आज केज शहर गहिवरून गेले आहे आणि सर्वत्र शोककळा दिसून येत आहे.

# पूर्वीची ग्रामपंचायतच बरी होती

## बोंबला: योजनांचा लाभ मिळेना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव ग्रामपंचायतची २०१४ पासून झालेली नगरपंचायत आता दहा वर्षांची झाली आहे परंतु शहराची नगरपंचायत होऊन ही शहरवासीयांना पंचायत समितीच्या व कृषीच्या अनेक शेती उपयुक्त योजनेतून वगळण्यात आल्याने नगर पंचायत पेक्षा पूर्वीची ग्रामपंचायतच बरी असे म्हणण्याची नामुष्की सोयगाव वासीयांच्या वर आली आहे

सोयगाव ग्रामपंचायतचे नगर पंचायत मध्ये विभाजन झाल्या नंतर सोयगाव शहराला जिल्हा परिषद च्या सर्वच योजनांमधून वगळण्यात आले आहे सोयगाव पंचायत समिती आणि तालुका कृषी कार्यालयाच्या जिल्हा परिषद योजना शहरवासीयांना लागू नाही त्यामुळे सोयगावकरांना अनेक शेती उपयुक्त योजनांमधून वंचित राहावे लागत आहे सोयगावला नगरपंचायत झाल्यामुळे शहराला जिल्हा परिषदेच्या योजना लागू नाहीत तसेच अद्यापही नगर पंचायतीला शेती उपयुक्त योजना साठी गेल्या दहा वर्षांत निधीची पूर्तता करण्यात आलेली नाही त्यामुळे पंचायत समिती व कृषी कार्यालयाच्या अनेक योजना पासून सोयगावकर दूर आहे दरम्यान सोयगाव नगर पंचायत गेल्या दहा वर्षे ड वर्गात आहे त्यामुळे नगर पंचायतीला विशेष निधी मिळत नाही.

### मुख्याधिकारी सिल्लोडचा

सोयगाव नगर पंचायतीला सिल्लोडचे प्रभारी सुनील गोराडे हे मुख्याधिकारी आहे ते आठवड्यात एक दोन वेळा येतात इतर दिवस मात्र सोयगाव नगर पंचायत मुख्याधिकारी विना राहते दरम्यान या नगरपंचायत कार्यालयात कर्मचारीही पुरेसे नाही सिल्लोडचे तीन कर्मचारी प्रभारी आहे स्थापत्य अभियंता,लेखापाल आणि अधीक्षक हे तिन्ही कर्मचारी सिल्लोड वरून प्रभारी सोयगावला आहे त्यामुळे स्थानिक तीन ते चार कर्मचाऱ्यावर सोयगाव नगर पंचायतीचा। कारभार सुरू आहे.

# कड्यात शारदीय व्याख्यानमाला

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवरात्र उत्सवानिमित्त श्रीराम वाचनालयाच्या वतीने शुक्रवार दि.४ ते बुधवार दि. ९ ऑक्टोबर या कालावधीत येथील श्रीराम मंदिरात शारदीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

कडा येथे नवरात्र उत्सवानिमित्त श्रीराम मंदिरात शारदीय व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले असून, या कालावधीत हभप. गोविंद महाराज जाटदेवळेकर हे 'मतपत्रिका हिच शक्ती', या विषयावर शुक्रवारी पहिले पुष्प गुंफणार आहेत, तर शनिवार दि. ५ रोजी विकास उमापूरकर' 'माध्यमांचा वापर आणि लोक', रविवार दि.६ रोजी श्रीमती अनिता चव्हाण 'दुर्गेची आधुनिक रुपे',सोमवार दि.७ रोजी दामोदर प्रकाश रामदासी ' समर्थ रामदास स्वामींची शक्ती', मंगळवार दि.८ रोजी प्रा. अशोक कानडे 'मंदिर स्थापत्यकला व परंपरा', बुधवार दि.९ रोजी डॉ विजयकुमार फड 'ज्ञानेश्वरीतील आनंद लहरी' आदी व्याख्याते या शारदीय व्याख्यामालेत लाभणार आहेत.

# परळीमध्ये दांडिया महोत्सवाचे आयोजन

## परंपरा: श्रध्दा हालगे-फुलारींचा उपक्रम

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील नामांकित अरोही स्टाईल स्टुडीओ च्या संचालिका,सामाजीक कार्यकर्त्या सौ.श्रध्दाताई गजानन हालगे- फुलारी यांच्या वतिने नवरात्रोत्सवात फक्त महिलांसाठी गुरुलिंग स्वामी मठ (बेलवाडी) येथे नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन यामध्ये महिलांसाठी खेळ पैठणीचा,फॅशन शो,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धा घेण्यात येणार आहेत.या दांडीया महोत्सवासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन सौ.श्रध्दाताई हालगे-फुलारी यांनी केले आहे.

परळी शहरातील महिलांसाठी अल्पदरात मेकअप सुविधा उपलब्ध करुन देणार्या अरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका सौ.श्रध्दाताई हालगे-फुलारी या सामाजीक उपक्रमात सहभागी असतात.नवरात्रोत्सवातील दांडीया महोत्सव आणी सौ.हालगे एक समिकरण बनले आहे.यावर्षी परळी शहरातील महिलांना आपल्याच भागात दांडीया खेळाचा आनंद घेता यावा यासाठी अरोही स्टाईल स्टुडीओच्या वतिने गुरुवार दि.३ ते शनिवार दि.१२ सप्टेंबर या कालावधीत पार पडत असलेल्या नवरात्रोत्सवात प्रभु वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या संत गुरुलिंगस्वामी मठ,बेलवाडी येथे दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे आयोजन केले आहे.

यामध्ये फॅशन शो,खेळ पैठणीचा,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धा घेण्यात येणार आहेत.स्पर्धेतील विजेत्या महिलांना प्रथम,द्वितीय व तृतीय अशी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.नारीशक्ती दांडीया महोत्सवात सहभागी होण्यासाठी बेलवाडी येथे मोफत प्रशिक्षण सुरु असुन यामध्ये सहभागी होण्यासाठी ७०५७३४५१९० व ९०९५१९१२१२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सौ.श्रध्दाताई हालगे-फुलारी यांनी केले आहे.

## ऋणानुबंध — मुख्य अभियंता सुनिल इंगळेंच्या हस्ते गौरव

# अविरत सेवेचा यथोचित सन्मान

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील संच क्रमांक ८ येथे सुरक्षितता विभागातील सुरक्षिता अधिकारी या पदावर कार्यरत असणारे सहाय्यक अभियंता युवराज शंकरराव शिंदे किल्लारीकर यांना दि ३० रोजी सायं ४ वा. प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सेवापूर्ती कार्यक्रम निरोप देण्यात आला. या सेवानिवृत्त अधिकारी मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

सविस्तर माहिती अशी की,

युवराज शिंदे यांनी परळी येथे संच क्र १ ते ८ तसेच भुसावळ येथील वीज निर्मिती केंद्रात तीन वर्षे उत्कृष्ट काम केले. तसेच एकूण ३१ वर्षे महानिर्मिती मध्ये सेवा दिली. या वेळी त्यांच्यावर बनवण्यात आलेल्या चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता सुनिल इंगळे हे होते.



या वेळी प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता डी डी कोकाटे,राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) अरविंद येरणे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, एम एम जाधव,मदन पवार, महादेव वंजारे, हरिभाऊ गित्ते , बी एम शिरसाट, संजय उदर,यांच्यासह सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.पत्नी सुनीता शिंदे,मुलगा सुरज शिंदे,सून ज्ञानेश्वरी शिंदे,मुलगी शिवानी शहापुरे,जावई विवेक शहापुरे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजू गजले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याणाधिकारी शरद राठोड यांनी मानले.

# परळीचे रमेश रोडे यांचे निधन

## ऋणानुबंध: धनंजय मुंडेंकडून रोडे परिवाराचे सांत्वन

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

आदर्श शिक्षक नामदेव रोडे गुरुजी यांचे सुपुत्र रमेश रोडे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते. त्यानंतर राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांनी नामदेव रोडे गुरुजी यांच्या भीमवाडी येथील निवासस्थानी आज दिनांक २ ऑक्टोंबर रोजी भेट देऊन रोडे परिवाराचे सांत्वन केले.

रमेश नामदेवराव रोडे यांचे दिनांक २९ सप्टेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले होते. त्यांच्यावर परळी शहरातील भीमनगर शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. रमेश रोडे हे आदर्श शिक्षक नामदेव रोडे गुरुजी यांचे तृतीय चिरंजीव होते. तसेच माजी नगरसेवक महेंद्र रोडे



त्याबरोबरच फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते सुरेश रोडे, आणि वैद्यनाथ महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक अशोक रोडे यांचे बंधू होते.नामदार धनंजय मुंडे यांनी रोडे परिवारास धीर दिला व त्यांचे सांत्वन केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके, जयपाल लाहोटी ,रवींद्र परदेशी, जालिंदर नाईकवाडे, रामेश्वर महाराज कोकाटे तसेच मिलिंद गरुड यांच्यासह भिमवाडी येथे नागरिक उपस्थित होते.



## उपमुख्यमंत्री अजित पवार रविवारी अकोल्यामध्ये

**अकोले :** अकोलेत विविध विकास कामांचे उद्‌घाटन व भुमिपुजन कामांचा शुभारंभ तसेच जाहीर सभा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी पार पडणार असून त्यांची जाहीर सभा सकाळी ११ वाजता बाजारतळ येथे होणार आहे, अशी माहिती शहर अध्यक्ष विनायक धुमाळ यांनी दिली. दरम्यान आ. डॉ.किरण लहामटे यांनी अकोले शहरासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे कडून भरघोस निधी आणला असून अकोले शहराचा चेहरा-मोहरा बदलून टाकला आहे. बाजारतळाचे काँक्रीटीकरण तसेच नवीन ओटे व लाईटचे विद्युत दिवे बसविले गेल्याने बाजारतळात पूर्ण लखलखाट झाला आहे. बसस्थानकाचे संपूर्ण काँक्रीटीकरण व सुशोभिकरण झाले आहे. अकोले शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अशा पुतळ्याचे नुतनीकरण व भव्य असा प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम झाला आहे.शहरातील अनेक रस्त्याचे काँक्रीटीकरण, कारखाना रोड तसेच देवठाण रोड, तहसिल कचेरी रोड भव्य अशा तहसिल कार्यालयाची इमारत बांधकाम तसेच महालक्ष्मी मंदिराकडे जाणारा परखतपूर रोड, अकोले शहरासाठी उपजिल्हा रूग्णालय मंजुर झाले आहे. तसेच एमआयडीसी मंजुर झाली आहे. यापुढेही अकोले शहरासाठी अनेक विकासाची कामे करण्याचा आ. डॉ किरण लहामटे यांचा मानस आहे.अकोले शहरातील सर्व नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सभेसाठी उपस्थित रहावे असे आवाहन अगस्ती सह.साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम गायकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शरदराव चौधरी, उपाध्यक्ष डॉ. मनोज मोरे, सेक्रेटरी प्रशांत धुमाळ, शहराध्यक्ष विनायक धुमाळ, उपाध्यक्ष सोमनाथ बाळसराफ, ज्ञानेश्वर चौधरी, आबा नाईकवाडी, संतोष नाईकवाडी, विकास वाकचौरे, साहेबराव लांडगे यांनी केले आहे.


# अवैध धंदे बंद होण्यासाठी कोल्हे गटाचे आज आमरण उपोषण

## राजकीय मांडवल्या करणारा तो सचिन कोण? कॉल डिटेल्स काढण्याची मागणी

◆ **कोपरगांव (प्रतिनिधी):**

कोपरगांव शहरात गोळीबार घटना झाल्याने नागरिक धास्तावले आहेत.त्यात गोळी लागलेली व्यक्तीला रुग्णवाहिकेतून नेत असताना त्याने लोकप्रतिनिधी आणि त्यांचे स्विय सहाय्यक यांचे नावे घेतलेला व्हिडिओ सर्वप्रथम प्रसिद्ध केला. धक्कादायक नावे घेतले आहे.त्यांच्यावर अद्यापही काहीही कारवाई झालेली दिसत नाही. तसेच वाढती गुन्हेगारी ही अवैध व्यवसायामुळे फोफावते आहे. नागरिक,व्यापारी,महिला,लहान मुले अनेकदा या व्यवसायाने त्रस्त होत आहेत.यामुळे व्यसनाधिनता वाढून नागरिकांच्या जिवितीला धोका निर्माण झाला आहे.अद्यापही अवैध धंदे बंद नाहीत तसेच गोळीबार प्रकरणात अन्य नावांची चौकशी करावी अशी मुदत देऊनही कारवाई न झाल्याने भाजपा शहराध्यक्ष दत्ता काले,माधवराव आढाव पतसंस्थेचे चेअरमन विजय आढाव, माजी नगरसेवक बबलू वाणी,संदीप देवकर आदींनी पत्रकार परिषद घेवून २ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समोर उपोषणास बसण्याचे घोषित केले आहे.

दरम्यान चक्री,बिंगो,कूत्ता गोळी,गांजा यासह अनेक अवैध व्यवसाय सुरू आहे.यामुळे गुन्हेगारी वाढली आहे.नुकतेच झालेल्या गोळीबार प्रकरणात राजकीय नावे वगळण्यासाठी कोणाचा दबाव



पोलिसांवर आहे. अनेक मांडवल्या करणारा तो सचिन कोण ? असे प्रश्न उपस्थित केले आहे.यासह अनेक गैर कृत्यात कोण सामील आहेत. त्यांचे फोन कॉल डिटेल्स काढण्यात यावे.तहसील पुरवठा अधिकारी नक्की कुणाच्या दबावात जिवानिशी गेला आहे त्याचेही सी.डी. आर काढून चौकशी करण्यात यावी आणि खऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.प्रत्येक वेळी रेशन घोटाळा आणी अवैध धंदे बंद व्हावे यासाठी युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी आवाज उठवला आहे. पोलीस स्टेशन येथे निवेदन देऊन दहा दिवसात या घटनेचा छडा लावून ज्याला गोळ्या लागल्या त्याने घेतलेल्या नावांची अद्यापही चौकशी झाली नाही हे कायदा सुव्यवस्था पायदळी तुडवल्याचे लक्षण आहे. सत्तेचा गैरवापर करून फसवणूक सुरू आहे. ज्यांनी आमच्या नेत्यांवर खोटे कुभांड रचून स्वतःचे पाप झाकण्याचा प्रयत्न केला त्यांना जाहीर आव्हान देत गैरकृत्यांचा पेन ड्राईव्ह पत्रकार परिषदेत दाखवला गेला त्यामूळे विरोधी गोटातील अनेक चेहरे हे त्या पातळीवर गेल्यास उघड होतील असे सूचित करण्यात आले आहे.अतिशय खालच्या दर्जाचे राजकारण करणाऱ्या विरोधकांनी आपले वाईट कामे झाकण्यासाठी जर आमच्या नेत्यांवर टीका केली तर खरे या गुन्हेगारीचे मालक कोण हे समोर येईल आणि अनेकांचे कारनामे उघड होतील.प्रत्यक्षात मूळ मुद्दा गोळीबार प्रकरणात असणाऱ्यांचे सि.डि.आर तपासले जावे, या आग्रही मागणीसाठी हे उपोषण होणार आहे. विवेकभैय्या कोल्हे यांनी तरुणांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी रोजगार मेळावा आयोजित केल्याने विरोधकांना अवैध व्यवसाय करण्यासाठी तरुण मिळणार नाहीत आणि सत्ता गेल्यावर ते बेकार होणार आहेत.या भीतीपोटी मूळ विषय भरकटवण्याचा केविलवाणा प्रयत्न त्यांनी केला आहे. आम्ही उपोषण करून अवैध व्यवसाय बंद व्हावे यासाठी परखड भूमिका घेत आहोत असे स्पष्ट करण्यात आले.

# एक रुपयात पीक विमा योजनेची शेतकऱ्यांची ७१३ कोटी रुपयांची रक्कम मंजूर

◆ **शिर्डी (प्रतिनिधी):**

महायुती सरकारने सुरु केलेल्या महत्वाकांक्षी एक रुपयात पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रलंबित असलेली सुमारे ७१३ कोटी रुपयांची रक्कम महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे मंजुर झाली असून, याबाबतचा शासन आदेशही निर्गमीत झाल्याने विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होण्याचा मार्ग निर्वेध झाला आहे.

दरम्यान केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी व आर्थिक उत्पन्न वाढीसाठी प्रधानमंत्री पीकविमा योजना सुरु केली. याच धर्तीवर राज्य सरकारने खरीप

रुपयात पीक विमा योजना सुरु करणारे महाराष्ट्र राज्य हे देशात एकमेव आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका या योजनेच्या माध्यमातून महायुती सरकारने घेतली होती. विमा रक्कम तातडीने मिळावी यासाठी प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करुन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांची उर्वरित रक्कम मंजुर करुन घेण्यात यश आल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### महसूलमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

हंगाम २०२३ पासून एक रुपयात पीक विमा योजना सुरु केली. या योजनेत जिल्ह्यातील ११ लाख ८८ हजार शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.मंध्यतरी झालेला अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक संकटांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना या योजनेच्या माध्यमातून २५ टक्के अग्रीम रक्कम देण्यात आली होती. जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून, याबाबत राज्य सरकारने अध्यादेशही काढल्याने जिल्ह्यातील पीक विमा धारक शेतकऱ्यांना उर्वरित ७१३ कोटी रुपये मिळणार आहेत.

जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत ठिबक व तुषार सिंचनाच्या अनुदानाची सुमारे ३३ कोटी रुपयांचे अनुदानही मंजुर झाले असून जिल्ह्यातील १२ हजार २२४ शेतकऱ्यांना हे अनुदान प्राप्त होणार असल्याची माहिती पालकमंत्री ना.विखे पाटील यांनी दिली.जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून, विमा कंपनी व राज्य शासनामार्फत विमा रक्कमेचा उर्वरित निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि आधिकारी सुधाकर बोराळे यांनी सांगितले.

# प्रक्रिया प्रशिक्षणाच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी : डॉ. ससाणे

◆ **राहुरी (प्रतिनिधी):**

आवळा फळ हे बहुगुणी आहे. या फळातील अनेक औषधी गुणधर्मामुळे प्रक्रियायुक्त पदार्थांना दिवसेंदिवस मागणी वाढत आहे. आपल्या शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आवळ्याचे किंवा आवळ्यापासून बनविलेल्या पदार्थांचे सेवन फायदयाचे असल्याने आवळा प्रक्रियेच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले.

दरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात आवळा फळप्रक्रिया या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि.२३ ते २७ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. आवळा प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना त्याच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड, काढणीपश्चात तंत्रज्ञान केंद्रांचे प्रमुख डॉ. जितेंद्र ढेमरे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाबासाहेब भिटे व अर्थशास्त्र विभागातील कृषि संशोधन अधिकारी डॉ. जितेंद्र दोरगे उपस्थित होते.प्रास्ताविक करताना डॉ. विक्रम कड म्हणाले की सुशिक्षितांना प्रक्रिया तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण, तांत्रिक सेवा व सल्ला उपलब्ध करून त्यांना स्वतःचा प्रक्रिया लघुउद्योग सुरू करण्यास प्रवृत्त करणे आणि या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश्य आहे. फळ प्रक्रियेचे आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविण्याचा या विभागाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान आवळा कॅन्डी, आवळा गर, आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा पावडर, आवळा लोणचे, आवळा सिरप व स्क्वॅश इ. पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षणार्थ्यांना शिकविण्यात आले. त्याबरोबरच आवळा प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशिनरी, प्रक्रिया पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, उद्योगाची नोंदणी याबरोबरच प्रक्रिया उद्योगातील अडचणी व त्यावरील उपाययोजना याबद्दल देखील माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर, कोल्हापूर, जळगांव, पालघर, पुणे आणि अहमदनगर या जिल्हयातून प्रशिक्षणार्थ्यांनी यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री. राहुल घुगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पदव्युत्तर महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती सविता धनवडे, श्री. गोरक्षनाथ चौधरी, श्री. पोपट खर्से व श्री. सुभाष माने यांनी परिश्रम घेतले.

## वेचक

## देशाला आज महापुरुषांच्या विचारांची गरज: संदीप मगर

**श्रीरामपूरः** तालुक्यातील जाफराबाद येथे भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या शाखेचे उद्‌घाटन जिल्हाध्यक्ष संदीप मगर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मगर म्हणाले आज देशाला महापुरुषांच्या विचारांची गरज आहे. कारण तरुण पिढी ही महापुरुषांच्या विचारांपासुन दूर गेली आहे. ज्या महापुरुषांनी आपला स्वतःचा त्याग करून देश घडवला त्या महापुरुषांचा अनुकरण करणे आज खरच काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वांनी आपल्या घरातील लहान मुले तरुण पिढी यांना महापुरुषांचे विचार अनुक्रत करावे जेणेकरून तरुण पिढी त्यांच्या विचारवंत चालेल असे म्हणाले. यावेळी भीमशक्ती संघटनेमध्ये नवीन कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. दरम्यान शाखा अध्यक्ष अर्जुन सोनवणे, उपाध्यक्ष सुदाम गायकवाड, महासचिव शाहरुख पटेल, कार्याध्यक्ष संतोष दळवी, उपकार्याध्यक्ष सलमान शेख, संघटक सोमनाथ नागल, सचिव वैभव बर्डे यांना पद देण्यात आले. तसेच श्रीरामपूर तालुका महिला शहर अध्यक्ष रोहिणी ताई बनसोडे याची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा सचिव अल्ताफ भाई शेख महिला जिल्हा उपाध्यक्ष विजयताई बारसे जिल्हा सहकार्य अध्यक्ष अनिल बोधक, श्रीरामपूर तालुका संपर्कप्रमुख किशोर अभंग, युवक अध्यक्ष अनिल माघाडे, युवक उपाध्यक्ष बबलू त्रिभुवन, शाखाध्यक्ष सचिन राठोड, शहराध्यक्ष अंबादास निकाळजे, बेलापूर शहराध्यक्ष समीर पठाण, फैजान पटेल, सागर गांगुर्डे, अमित पटेल, वजीर पठाण, गणेश त्रिभुवन, निलेश निघाल, सुरज गायकवाड, हर्ष शिंदे, बाळू निकम, किरण इंगळे, भैय्या इंगळे, विलास गांगुर्डे, ओम बर्डे आदी उपस्थित होते.

## राहुरीत आदिशक्तीचा जागर सोहळ्याचे ५ ऑक्टोबरला आयोजन

**राहुरी :** राहुरीचे आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या संकल्पनेतून तुळजा भवानी मातेच्या पालखीचे माहेरघर असलेल्या राहुरी शहरात आदिशक्तीचा जागर या सोहळ्याचे आयोजन शनिवार दि.५ ऑक्टोबर सायंकाळी ६ वाजता डॉ नेहे हॉस्पिटल शेजारील मैदानात आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन आमदार प्राजक्त दादा तनपुरे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मुंबईच्या इंडियाज गॉट टॅलेंट ग्रुपचे एक्स वन एक्स डान्स ग्रुप हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असणार असून खासदार डॉ अमोल कोल्हे व आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. नवरात्रोत्सव निमित्ताने शनिवार दि.५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता राहुरीतील स्टेशन रोडवरील डॉ. नेहे हॉस्पिटल जवळील मैदानावर आदिशक्तीचा जागर हा सोहळा पार पडणार आहे .या सोहळ्याप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या महिलांना नवरात्र उत्सव निमित्त फराळाची मेजवानी दिली जाणार आहे. माजी नगराध्यक्षा डॉ उषा तनपुरे, ओजस्विनी पतसंस्थेच्या संस्थापिका सुजाता तनपुरे, सोनाली तनपुरे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या तालुकाध्यक्ष शारदा खुळे, शहराध्यक्ष अपर्णा ढमाळ, सायली तनपुरे यांनी या सोहळ्याला राहुरी शहरासह तालुक्यातील महिला भगिनींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार प्राजक्तदादा तनपुरे मित्र मंडळ मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

# मुळा व ज्ञानेश्वर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक : बाळासाहेब मुरकुटे

◆ **नेवासा (प्रतिनिधी):**

जिल्ह्यातील इतर कारखान्यांनी ३००० रु टना पेक्षा जास्त भाव दिला. परंतु ज्ञानेश्वर व मुळा कारखान्याने २७०० रु. भाव देऊन शेतकऱ्यांची घोर फसवणूक केली असल्याचा आरोप माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी केला आहे.

दरम्यान दि.२९ सप्टेंबर रोजी झालेल्या ज्ञानेश्वर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी सांगितले की कार्यक्षेत्रामध्ये ऊस असून देखील त्याची तोड न करता बाहेरून ऊस आणत आहे. या उसाला २८०० ते ३००० रुपये भाव दिला जात आहे मात्र तालुक्यातील शेतकऱ्यांना २७०० रु. भाव देवून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. त्यामुळे उस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निराशाजनक वातावरण आहे. ५३ वर्षाच्या कारकीर्दीत वीस वर्षात कारखाना कर्ज बाजरी करण्यात कारखाना संचालक मंडळच कारणीभूत आहे.

कारखान्याच्या तिजोरीतून राजकीय निवडणुका शेतकऱ्यांच्या जीवावर केल्या जातात. आडमाप पैशांचा उधामाधा केल्यामुळेच शेतकऱ्यांच्या या कामधेनु संकटात टाकण्याचे काम आजपर्यंत केले जात आहे. व हे कारखाने त्यांनी कर्जबाजारी केले आहेत. जेव्हा शेतकऱ्यांना काही देण्याची वेळ येते तेव्हा मात्र साहेब, भाऊ म्हणून घेणाऱ्यांचे तोंड मात्र मूक गिळून गप्प बसत हि आश्चर्याची बाब आहे असा टोला माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी लगावला.येणाऱ्या गळिताचा भाव कारखान्याने जाहीर न केल्याने तसेच मागील वर्षातील दिवाळी साठी शेतकऱ्यांना कुठलीही तरतूद न केल्याने मुरकुटे यांनी कारखाना व्यवस्थापनाचा निषेध व्यक्त केला आहे.पुढे बोलतांना मुरकुटे म्हणाले कि, शिरसगांव, सलाबतपुर व नेवासा कार्यक्षेत्रात ऊस तोडणी मजूर दिले जात नाही.

# भविष्यातील सिंचन व्यवस्थापन हे बदलत्या वातावरणाशी सुसंगत असावे : कुलगुरू

◆ **राहुरी (प्रतिनिधी):**

शेतीसाठी पाण्याची उपलब्धता हा विषय दिवसेंदिवस जटील बनत आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन आवश्यक असून भविष्यातील सिंचन पाणी व्यवस्थापन हे बदलत्या वातावरणाशी सुसंगत असावे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.




दरम्यान अखिल भारतीय समन्वीत जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पातील भारताच्या पश्चिम विभागातील प्रमुख शास्त्रज्ञांची पंचवार्षिक संशोधन आढावा बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठात आयोजीत करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी पंचवार्षिक बैठकीचे प्रमुख व नवी दिल्ली येथील कृषि शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी सदस्य डॉ. व्ही.एन. शारदा, पंचवार्षिक बैठकीचे सदस्य व आंध्रप्रदेशातील सी.व्ही. रमण वैश्वीक विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस.एन. पांडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. यु.एम. खोडके, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, भुवनेश्वर येथील भारतीय जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस. मोहंती आंतरविद्या जलव्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे व कृषि विद्या विभाग प्रमुख तथा जलव्यवस्थापन प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते.यावेळी डॉ. व्ही.एन. शारदा यांनी जलसिंचनाच्या पाण्याचा वापर करतांना पृष्ठभागावरील पावसाचे पाणी, प्रवाही कॅनॉलचे पाणी, शेततळ्यातील पाणी व भुगर्भातील पाणी यांचे एकात्मिक कार्यक्षम वापरासंबंधी मार्गदर्शन केले. त्यांनी देशातील विविध राज्यातील पाणी लवादाच्या गांभीर्याविषयी संबोधन करुन प्रत्येक प्रकल्पाला कृषि पर्यावरणीय हवामान विभागानुसार पीक व पाणी नियोजन करण्याचे आवाहन केले. डॉ. एस.एन. पांडा यांनी आपल्या मनोगतात पाण्याची गुणवत्ता व संवेदन तंत्र आधारीत पाणी व्यवस्थापन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. यु.एम. खोडके यांनी आपल्या मनोगतात पाणी व्यवस्थापनाच्या आधुनिक सिंचन प्रणालीच्या वापराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते राहुरी येथील जलसिंचन प्रकल्पातील शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पोपळे, डॉ. अनिल दुरगुडे आणि डॉ. प्रशांत बोडके लिखीत जलसिंचन प्रकल्पातील सर्व शिफारशींचे माहिती पुस्तीका व नवसारी गुजरात येथील जलसिंचन प्रकल्पातील शास्त्रज्ञ डॉ. एन.जी. सावंत, डॉ. एस.एल. पवार व डॉ. व्ही.आर. नाईक लिखीत ऊस आणि केळी या पिकांची उत्पादकता वाढविण्याविषयी जलव्यवस्थापन तंत्रज्ञान पुस्तीका यांचे विमोचन करण्यात आले. या पंचवार्षिक आढावा बैठकीचे नियोजन डॉ. एस. मोहंती व बैठकीचे सदस्यसचिव डॉ. आर.एन. पांडा यांनी केले होते.

यावेळी माजी अधिष्ठाता डॉ. बापुसाहेब भाकरे, माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके तसेच पश्चिम विभागातील प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. प्रशांत बोडके यांनी मानले.

# सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपण

## नवी दिल्ली येथील नॅशनल फेडरेशन यांच्या स्वच्छता सेवा उपक्रमांतर्गत

◆ **कोपरगाव (प्रतिनिधी) :**

नॅशनल फेडरेशन नवी दिल्ली यांच्या स्वच्छता सेवा उपक्रमांतर्गत तालुक्यातील शिंगणापुर येथील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर सेंद्रिय खत प्रकल्पाच्या मोकळ्या जागेत एक वृक्ष आईच्या नावांने (एक पेड माँ के नाम) या संकल्पनेतुन कार्यकारी संचालक बाजीराव जी. सुतार यांच्या हस्ते वृक्षारोपण अभियान कार्यक्रम शुक्रवारी राबविण्यात आले.

दरम्यान याप्रसंगी बाजीराव जी. सुतार बोलतांना म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे हे सतत माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या जयंती व पुण्यतिथीचे औचित्य साधत तसेच विविध वाढदिवस नैमित्तीक




समारंभानिमीत्त कारखाना परिसरासह कोपरगांव शहर तसेच ग्रामिण भागातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत- सोसायटी कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आदि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणांत मोफत वृक्ष पुरवुन त्याची लागवड करून संगोपनाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवितात. त्याच पावलांवर पाउल ठेवत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य शासनाचे सर्व अभियान कारखाना परिसरात तसेच सभासद शेतकऱ्यांच्या बांधावर नियमीतपणे राबविण्यात येतात.

नॅशनल फेडरेशन नवी दिल्ली यासंस्थेने राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना त्या त्या भागात (एक पेड माँ के नाम) आईची आठवण म्हणून वृक्षारोपण करावे असे अभियान राबविण्याबाबत कळविले होते, त्यात सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, उपखातेप्रमुख आदिंनी सहभाग घेत शुक्रवारी मोठ्या प्रमाणांत देशी वाण असलेले लिंब, वड, पिंपळ, करंज, अमलताज, लक्ष्मीतारू, बकुळ आदि विविध जातींचे वृक्षांची लागवड करण्यांत आली, जेणेकरून आगामी काळात त्याचा पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोठ्या प्रमाणांत उपयोग होईल असे ते शेवटी म्हणाले. याप्रसंगी साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे, व्यवस्थापकीय व्यवस्थापक प्रकाश डुंबरे, उस विकास अधिकारी शिवाजी देवकर, एच आर प्रदिप गुरव यांच्यासह सर्व खातेप्रमुख, उपखाते प्रमुख मोठ्या संख्येने हजर होते.

# जागतिक रेबीज दिनानिमित्त मोफत लसीकरण शिबीर : पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आरोग्य

◆ **अकोले (प्रतिनिधी):**

आपल्या घरात कुत्रा किंवा मांजर असे पाळीव प्राणी असतील तर त्यांना आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित करण्याच्या हेतूने पशुसंवर्धन विभाग अकोले जागतिक रेबीज दिनाचे औचित्य साधुन शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी मोफत श्वानदंश प्रतिबंधात्मक (अँटी रेबीज) लसीकरण, जंतनाशक औषध वाटप व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आला होता. या शिबिराला अकोले शहरातील व तालुक्यातील कुत्रा व मांजर प्रेमी कडून उस्फूर्त प्रतिसाद दर्शविण्यात आला.

दरम्यान या शिबिरामध्ये ७४ कुत्रा व मांजर यांचे अँटी रेबीज लसीकरण व जंत निर्मूलन करण्यात आले. तसेच या सर्व प्राण्यांचे आरोग्य तपासणी करून आरोग्य बाबत डॉ. अतुल पाटणे, सहाय्यक आयुक्त




पशुसंवर्धन , अकोले तालुका यांनी मार्गदर्शन करण्यात केले.रेबीज नावाचा रोग मराठीत त्याला पिसाळणे असे म्हणले जाते. हा विषाणूजन्य रोग मानवी आरोग्याच्या दृष्टीने देखील खूप महत्त्वाचा आहे हा रोग कुत्रा किंवा मांजर यांच्याकडून मानवाला होण्याची शक्यता असते त्यामुळे मानवी आरोग्याचे महत्त्व लक्षात घेता, घरातील पाळीव प्राण्यांना या रोगाचे प्रतिबंधात्मक लसीकरण करणे महत्त्वाचे असते. तसेच त्यांचे आरोग्य देखील सुदृढ ठेवण्याचे दृष्टीने त्यांना रेग्युलर जंताचे औषध देणे महत्त्वाचे असते. या सर्व बाबींचा विचार करून पशुसंवर्धन विभाग अकोले मार्फत जागतिक रेबीज दिनाचे औचित्य साधून तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय अकोले या ठिकाणी मोफत अँटी रेबीज लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराला अकोले तालुक्यातील तालुक्यातील कुत्रा व मांजर प्रेमींनी उस्फुर्त प्रतिसाद दर्शविला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ नीता दांगट, प.वि.अ.अकोले, डॉ आर. डी.भांगरे, प.वि.अ. इंदुरी, डॉ. राजपूत, ऋषी नवले, देशमुख मेजर व इतर सहकाऱ्यांनी मदत केली. तसेच वेंकिज व व्हिरबॅक कंपनी यांनी देखील विशेष सहकार्य केले.



## विटा बसस्थानक पुनर्बांधणीचे भूमिपूजन

**मुंबई :** विटा येथील बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे १३ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या या बसस्थानकामध्ये १८ फलाटांची निर्मिती करण्यात येणार आहे. सर्व बांधकाम हे आरसीसी स्वरूपात करण्यात येणार आहे. या इमारतीमध्ये उपाहारगृह, दुकानगाळे, संरक्षित भिंत तसेच प्रवेशद्वार त्याचबरोबर बसस्थानकाच्या अंतर्गत भागाचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या अद्ययावत बसस्थानकाच्या पुनर्बांधणीमुळे लोकांना अत्याधुनिक सोयी – सुविधायुक्त बसस्थानक मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, खासदार धैर्यशील माने, आमदार शहाजी बापू पाटील, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, मनपा आयुक्त तथा प्रशासक शुभम गुप्ता, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, माजी जि. प. सदस्य सुहास बाबर, अमोल बाबर, आनंदराव पवार प्रामुख्याने उपस्थित होते.



## मराठी रंगभूमी

- **ऑल दी बेस्ट**
  दु. ४.३० वा. सावित्रीबाई फुले, डोंबिवली
- **आज्जीबाई जोरात**
  दु. ४ वा. यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा
- **वस्त्रहरण**
  दु. ४ वा. कालिदास नाट्यमंदिर, मुलुंड
- **इवलेसे रोप**
  दु. ४.३० वा. प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली.
- **करून गेलो गाव**
  रात्रौ. ८ वा. प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
- **नियम व अटी लागू**
  रात्रौ ८.३० वा. कालिदास नाट्य मंदिर, मुलुंड
- **गेला माधव कुणीकडे**
  दु. ४.३० वा. दीनानाथ नाट्यगृह, पार्ले
- **जर तरची गोष्ट**
  ९.३० वा. बालगंधर्व रंगमंदिर, पुणे
- **अलबत्या गलबत्या**
  दु. ४ वा. श्री शिवाजी मंदिर, दादर.

## वेचक

### आनंदराव अडसूळ यांची अनु. जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई :** माजी खासदार आनंदराव अडसूळ यांची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अडसूळ यांनी अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या उपाध्यक्षपदी धर्मपाल मेश्राम यांची नियुक्ती तर गोरक्षक लोखंडे आणि वैदेही वाढाण यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाचे उपाध्यक्ष आणि सदस्यांनीही आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. अशी माहिती, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती - जमाती आयोगाने कळविले आहे.

### प्रलंबित पी. टी. प्रकरणे निकालासाठी उद्या शिबिराचे आयोजन

**मुंबई :** केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान अंतर्गत पालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर, मागील ५ वर्षांतील प्रलंबित वारसाहक्क व अनुकंपा पी. टी. प्रकरणे निकाली काढण्यासाठी पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने दि.३ ते८ ऑक्टोबर या कालावधीदरम्यान पालिका मुख्यालयात दररोज सकाळी ११ वाजेपासून शिबिराचे आयोजन करण्यात आले.३ ते ८ ऑक्टोबर दरम्यान शिबिराचा पहिला टप्पा म्हणजेच परिमंडळ-१ मधील विविध प्रशासकीय विभाग कार्यालयांमधील प्रलंबित प्रकरणांबाबत शिबिर घेण्यात येत आहे.
उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) कार्यालय, तिसरा मजला, विस्तारित इमारत, पालिका मुख्यालय येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या अंतर्गत दि. ३ ऑक्टोबर रोजी ‘ए विभाग’, दि. ४ ऑक्टोबर रोजी ‘डी विभाग’, दि.७ ऑक्टोबर रोजी ‘बी आणि सी विभाग’ ८ ऑक्टोबर रोजी ‘ई विभाग’ कार्यालयांतील प्रलंबित प्रकरणांबाबत शिबिर घेण्यात येईल.

### आदित्य माहिमकर यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुंबई :** सामाजिक कार्यकर्ते व युवा से युवा फौंडेशन या संस्थेचे अध्यक्ष आदित्य अरुण माहिमकर यांनी आज मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील राजीव गांधी भवन, काँग्रेस पक्ष कार्यालयात शेकडों कार्यकर्त्यांसह राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आदित्य माहिमकर यांचा दक्षिण मुंबईत चांगला जनसंपर्क आहे. युवा से युवा फौंडेशनच्या माध्यमातून ते तरुण वर्गाशी जोडले गेले आहेत.आजच्या तरुणाचे प्रश्न, समस्या वेगळ्या आहेत आणि त्यावर आजही योग्य ते निर्णय घेताना फार उशीर होतो. हेच तरुण नेतृत्व आमच्या अनेक समस्यांचा योग्य तो तोडगा शोधताना आम्हाला दिसत आहे. प्रस्थापित नेतृत्वावरील विश्वास आता उडाला आहे आणि आता तरुण नेतृत्वासोबत अनेक नवीन बदल घडून येतील अशी इच्छा आदित्य माहिमकर यांनी बोलताना व्यक्त केली.

# सिमेंट काँक्रीट रस्ते कामाची 'आयआयटी' करणार गुणवत्ता तपासणी

### महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या सूचना

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई शहरातील विविध रस्त्यांची सिमेंट काँक्रिटीकरण कामे प्रगतिपथावर आहेत. पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाल्याचे भारतीय हवामान खात्याने जाहीर केले आहे. त्यामुळे १ ऑक्टोबरपासून रस्ते विकासकामांना वेग द्यावा. सिमेंट काँक्रिटीकरण कामाचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहावी यासाठी मुंबईतील भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) यांची गुणवत्ता नियंत्रणासाठी त्रयस्थ संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली. रस्ते विकासाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी होत असताना त्याचवेळी भारतीय तंत्रज्ञान संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणीचे कामकाज सुरू करावे. 'आयआयटी'ने गुणवत्ता तपासणी काटेकोरपणे करावी, असे स्पष्ट पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले.

शहरातील सर्व रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याच्या उद्देशाने पहिल्या टप्प्यात ३९२ किलोमीटर तर दुसऱ्या टप्प्यात ३०९ किलोमीटर असे एकूण मिळून ७०१ किलोमीटर रस्ते काँक्रिटीकरणासाठी कार्यादेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये



शहर विभाग, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरातील रस्ते कामाचा समावेश आहे. सिमेंट काँक्रिटीकरण कामाचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहावी यासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था यांची गुणवत्ता नियंत्रणासाठी त्रयस्थ संस्था (थर्ड पार्टी) म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पालिका आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. दुस-या टप्प्यातील ५ पॅकेज (शहर विभाग १, पूर्व विभाग १ आणि पश्चिम विभाग ३) आणि पहिल्या टप्प्यातील १ पॅकेजच्या कामांची गुणवत्ता तपासणी व अनुषंगिक कामे भारतीय तंत्रज्ञान संस्थेमार्फत केली जाणार आहेत.

१ ऑक्टोबरपासून रस्तेकामांची पूर्वतयारी सुरू होणे अपेक्षित आहे. तसेच, टप्पा क्रमांक १ मधील उर्वरित कामे, टप्पा २ मधील नव्याने सुरू होणारी कामे आवश्यक गती राखून व गुणवत्तेने कोणतीही तडजोड न होता सुरू होणे अपेक्षित आहे. ही कामे सुरू करताना प्राधान्यक्रम निश्चित केल्यापासून कामाची अंमलबजावणी पूर्ण होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर पालिका अभियंते व आयआयटी चमू (टीम) यांच्यात सुसंवाद ठेवणे गरजेचे आहे. आयआयटी चमू (टीम) व रस्ते विभाग यामध्ये समन्वय अधिक चांगल्या पद्धतीने होण्याकामी कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

आकस्मिक भेटी कार्यस्थळास प्रत्यक्ष भेट देणे, त्याबाबतची निरीक्षणे नोंदविणे, भेटीच्या दरम्यानची निरीक्षणे आणि त्याबरील सल्ला यांबाबत वेळोवेळी अभियांत्रिकी विभागातील अधिका-यांसोबत प्रतिसाद मिळविले. काँक्रिट प्लांटमध्ये मटेरियल बनविण्याच्या टप्प्यापासून ते काँक्रिट रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या विविध चाचण्यांद्वारे भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून तपासणी केली जाईल. त्यात क्युब टेस्ट, कोअर टेस्ट, स्लम्प कोन टेस्ट, ड्युरेबिलीटी टेस्ट, फिल्ड डेन्सिटी टेस्ट आदी विविध तांत्रिक चाचण्यांचा समावेश आहे. पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाल्याचे भारतीय हवामान खात्याने जाहीर केले आहे. त्यामुळे, १ ऑक्टोबर पासून रस्ते विकास कामांना वेग देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. या निर्देशांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. कामाचा दर्जा, गुणवत्ता यांच्यात हयगय कदापि खपवून घेतली जाणार नाही. पालिका अभियंते, कंत्राटदार यांनी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना बांगर यांनी दिल्या आहेत.

## मध्य रेल्वे दादर, भुसावळ विशेष गाड्यांची सेवा

**मुंबई :** विशेष गाड्यांची प्रचंड मागणी लक्षात घेता व प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे खालील विशेष गाड्यांची सेवा सुरू ठेवणार आहे. ०९०५१ दादर - भुसावळ - दादर त्रि-साप्ताहिक विशेषच्या ७८ सेवा ही त्रि-साप्ताहिक विशेष दर सोमवार, बुधवार, शनिवारी १ ऑक्टोबर ते ३० डिसेम्बर पर्यंत सुरु राहणार आहे. तर ०९०५२ त्रि-साप्ताहिक विशेष दर सोमवार, बुधवार आणि शनिवारी १ ऑक्टोबर ते ३० डिसेम्बर पर्यंत चालवल्या जातील. दादर -भुसावळ - दादर साप्ताहिक विशेष २६ सेवा ०९०४९ साप्ताहिक विशेष ४ ऑक्टोबर ते २७ डिसेम्बर पर्यंत दर शुक्रवारी चालवली जाईल. ०९०५० साप्ताहिक विशेष ४ ऑक्टोबर ते २७ डिसेम्बरपर्यंत दर शुक्रवारी चालवली जाईल. वर नमूद केलेल्या गाड्यांच्या वेळा, संरचना आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. या गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर विशेष शुल्कासह विशेष ट्रेनच्या सर्व विस्तारित फेऱ्यांसाठी उपलबध आहे.

## अटल सेतूवर उडी मारलेल्या बँक उपव्यवस्थापकाचा सापडला मृतदेह

**मुंबई :** अटल सेतूवर सोमवारी समुद्रात उडी मारलेल्या बँकेतील उपव्यवस्थापक सुशांत चक्रवर्ती यांचा मृतदेह नवी मुंबीतील जेएनपीटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडला. मृतदेहाची ओळख पटली असून नवी मुंबई पोलीस अपमृत्यूची नोंद करून प्रकरण शिवडी पोलिसांकडे वर्ग करणार असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. सुशांत चक्रवर्ती यांनी अटल सेतवरून उडी मारल्याची माहिती शिवडी पोलिसांना मिळाली. शिवडी पोलिसांनी तपासणी केली असता अटल सेतूवरून समुद्रात उडी मारणाऱ्या व्यक्तीची लाल रंगाची मोटारगाडी घटनास्थळी आढळली. ही मोटरगाडी सुशांत यांची असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# साखळी तयार करत विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा संदेश

◆ **मुंबई (वार्ताहर):**

भारतीय रेल्वेने स्वच्छ भारत मिशनच्या १०व्या वर्धापनदिनानिमित्त ‘स्वच्छता ही सेवा’ २०२४ ही मोहीम ‘स्वच्छता, संस्कार स्वच्छता’ या थीमखाली सुरू केली. या अनुषंगाने अरेडिका येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी केंद्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आरेडिकाच्या हॉकी स्टेडियमवर “MCF SHS २०२४”ची मानवी साखळी तयार करून स्वच्छतेचा महत्त्वाचा संदेश दिला.

स्वच्छता कार्यक्रमाला अधिक बळ देण्यासाठी स्काऊट आणि गाईड संघाची दोनदिवसीय जिल्हास्तरीय रॅली सेंट्रल पार्कमध्ये सुरू करण्यात आली. त्यात कॅम्प क्राफ्ट, ड्रॉईंग, मेहंदी, कुकिंग, वेस्ट ऑफ वेस्ट



रांगोळी, खेळ, कॅम्प फायर, पथनाट्य, नृत्य यांचा समावेश होता. स्काऊट गाईड्सच्या मुलांनी सेंट्रल पार्कमध्ये मानवी साखळी करून स्पर्धा, कार्यक्रम आयोजित करून स्वच्छतेचे महत्त्व दिले. २ ऑक्टोबर रोजी स्काऊट गाईड्सच्या मुलांकडून सर्वधर्मीय प्रार्थना करण्यात येणार असून त्यानंतर महाव्यवस्थापक प्रशांतकुमार मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये स्वच्छता कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर स्काऊटतर्फे मोहीम राबविण्यात येणार आहे. अरेडिका महाव्यवस्थापक प्रशांत कुमार मिश्रा यांनी स्वच्छता ही सामुदायिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत त्यांनी प्रत्येकाला स्वच्छतेचे नियमित पालन करण्याचे आवाहन केले. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या १५५व्या जयंतीनिमित्त स्वच्छ भारत दिवस साजरा करण्यासाठी सर्वांनी एकत्र येत या स्वच्छता मोहिमेत सहभागी होवून ते यशस्वी करण्याचे आवाहन केले.

### डेपोच्या सुविधा, भविष्यातील विस्तार योजनांचा घेतला आढावा

# रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून वाडीबंदर, मुंबईची पाहणी



◆ **मुंबई (वार्ताहर) :**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकताच वाडीबंदर कोचिंग डेपो, मुंबई येथे सर्वसमावेशक तपासणी केली. त्यांनी डेपोच्या पायाभूत सुविधा, तांत्रिक प्रगती आणि भविष्यातील विस्तार योजनांचा आढावा घेतला. तपासणीने प्रवाशांची सुरक्षा, स्वच्छता आणि सेवेची विश्वासार्हता वाढवण्यावर भर देण्यात आला. तपासणीचे प्रमुख मुद्दे ट्रेन स्पॉट आणि मेंटेनन्सवर भर देण्यात येणार आहे.

यावेळी मंत्र्यांनी एलएचबी (लिंक हॉफमन बुश) कोचमध्ये केलेल्या सुधारणांची पाहणी केली, ज्यामध्ये स्प्रिंग फेल्युअर्स कमी करण्यासाठी, राइड आराम आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी टीपीयू (TPU) रिंग जोडणे समाविष्ट आहे. स्वच्छता आणि प्रवाशांच्या आरामात नवकल्पना वैष्णव यांनी स्वच्छतापूर्ण वातावरण राखण्यासाठी डेपोच्या "बेस्ट फ्रॉम वेस्ट" प्रदर्शनात इन-हाऊस डिझाइन केलेल्या कचरा संकलनासारख्या नवकल्पनांद्वारे केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. स्वच्छतागृहांसह कर्मचाऱ्यांच्या सुविधांच्या स्वच्छतेचीही त्यांनी पाहणी केली. वंदे भारत एक्स्प्रेसच्या "१४-मिनिटांच्या आश्चर्यकारक" साफसफाईच्या प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या डायसन व्हॅक्यूम क्लिनरसह प्रगत स्वच्छता उपकरणांचा वापर मंत्र्यांनी वैयक्तिकरित्या प्रात्यक्षिक केला आणि प्रवाशांच्या आरामासाठी त्यांची बांधिलकी अधोरेखित केली.

### सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी प्रगत तंत्रज्ञान

तपासणीमध्ये एअर ब्रेक अखंडता सुनिश्चित करण्यासाठी अल्ट्रासोनिक एअर लीकेज डिटेक्शन सिस्टम आणि वेळेवर देखभाल करण्यासाठी FIBA (फेल्युअर इंडिकेशन आणि ब्रेक ऍप्लिकेशन) सिस्टम सारखी प्रगत साधने वैशिष्ट्यीकृत केली गेली. हे तंत्रज्ञान राजधानी एक्स्प्रेस सारख्या गाड्यांवर आधीच सुरक्षा वाढवत आहेत. याव्यतिरिक्त, मंत्र्यांना कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) चा वापर आणि IoT-आधारित रिअल-टाइम वॉटर लेव्हल मॉनिटरिंग सिस्टमच्या एकत्रीकरणाबद्दल माहिती देण्यात आली, जी प्रवाशांना स्वच्छ पाण्याचा अखंड प्रवेशाची हमी देते.

### देखभाल आणि प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित

मंत्री महोदयांनी वंदे भारत स्टोअरचा दौरा केला, जेथे वंदे भारत गाड्यांचे आवश्यक भाग साठवले जातात, वेळेवर दुरुस्ती आणि सेवेची विश्वासार्हता सुनिश्चित केली जाते. त्यांनी मूलभूत प्रशिक्षण केंद्राला भेट दिली, एलएचबी कोच प्रशिक्षणासाठी इन-हाऊस मॉडेल्सचे निरीक्षण केले, सुरक्षा आणि सेवा मानके आणखी मजबूत केली.

तांत्रिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि विलंब कमी करण्यासाठी, एकूण प्रवाशांचा अनुभव सुधारण्यासाठी कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी हँड-ऑन प्रशिक्षणासाठी VR तंत्रज्ञानाचा वापराचे कौतुक करण्यात आले.

### प्रवासी सेवा आणि तक्रार निवारण

एकात्मिक डेटा सेंटरमध्ये, वैष्णव यांनी प्रवाशांच्या तक्रारी हाताळण्यासाठी जबाबदार असलेल्या रेलमदद टीमशी संवाद साधला. तत्पर आणि प्रभावी तक्रारींचे निराकरण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि प्रवाशांचे समाधान वाढविण्यात योगदान दिले.

### अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन तयारी

मंत्र्यांना डेपोमध्ये अग्निशामक यंत्रणा व्यवस्थापित करण्यासाठी डिझाइन केलेल्या नवीन विकसित ॲपबद्दल देखील माहिती देण्यात आली, सर्व अग्निसुरक्षा उपकरणे सुस्थितीत आणि सहज उपलब्ध आहेत याची खात्री करून, प्रवाशांचे अधिक रक्षण होईल. अश्विनी वैष्णव यांनी सुरक्षित, स्वच्छ आणि अधिक कार्यक्षम रेल्वे प्रवास सुनिश्चित करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा अवलंब करण्याच्या वाडीबंदर डेपोच्या प्रयत्नांची प्रशंसा करून तपासणीची समाप्ती केली. या भेटीदरम्यान अधोरेखित करण्यात आलेल्या सुधारणा भारतीय रेल्वे प्रवाशांची सुरक्षा आणि सोई वाढवण्याची सतत वचनबद्धता दर्शवतात.

# 'बीएमएस मॅनेजमेंट कॉन्क्लेव्ह २४' उत्साहात

◆ **मुंबई (वार्ताहर) :**





बीएमएस सोसायटीने मॅनेजमेंट कॉन्क्लेव्ह' २४ चे नुकतेच आयोजन केले होते. या कार्यक्रमामुळे सिडनहॅम कॉलेजने एक नवा अध्याय समोर ठेवला आहे. या कार्यक्रमाने व्यवस्थापन शिक्षणाच्या सीमा ओलांडून आणि व्यावसायिक नेतृत्वाच्या भविष्याला आकार देत एक मोठे पाऊल उचलले आहे. या उपक्रमामुळे त्या दिवसाची सुरुवात एका उत्साहपूर्ण उद्घाटन समारंभाने झाली, जिथे प्राचार्य श्रीनिवास धुरे यांनी दीपप्रज्वलन समारंभानंतर मॅनेजमेंट कॉन्क्लेव्ह' २४चे अधिकृतपणे उद्घाटन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. नील सिक्वेरा यांनी मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून नेतृत्व आणि भावनिक बुद्धिमत्ता यांच्यातील संबंधावर अभ्यासपूर्ण भाषण केले. तर यश मिळविण्यासाठी आर्थिक आणि भावनिक गोष्टींवर जोर देऊन त्यांनी प्रत्येकाला त्यांच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी प्रोत्साहित केले. तर यावेळी मोहम्मद विराणी यांच्या नेतृत्वाखाली विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. उपस्थित वक्त्यांनीही विविध विषयांवर भाष्य केले. अक्षय गुरनानी यांनी नेतृत्वातील कृतज्ञतेच्या भूमिकेवर चर्चा केली, अभिषेक डागा यांनी उद्योजक म्हणून त्यांचे अनुभव शेअर केले आणि कुशल लोढा यांनी वित्त आणि सोशल मीडिया एकमेकांशी कसे जोडलेले आहेत हे स्पष्ट केले. सुरेश वर्मा यांनी एसइओ आणि करिअरच्या संक्रमणांविषयी माहिती दिली, तर सुशोवन सरकार यांनी एफएमसीजी क्षेत्रातील विपणन धोरणांवर लक्ष केंद्रित केले. शेवटी, समीर नंजनगुड यांनी जागतिक ब्रँडिंगमध्ये प्रादेशिक विविधतेचे महत्त्व सांगितले आणि महेश पट्टू यांनी व्यावसायिक आव्हानांवर मात करण्यासाठी धोरणात्मक विचार करण्यावर भर दिला. दरम्यान, ठेका कॉफीचे सह-संस्थापक अभिषेक आचार्य यांच्यासोबतचे मुख्य सत्र हे त्या दिवसाचे खास आकर्षण होते, जिथे त्यांनी शार्क टँकवर दिसण्याचा त्यांचा अनुभव आणि यशस्वी ब्रँड तयार करण्यासाठी आवश्यक असलेला दृढनिश्चय शेअर केला. डॉ. राधाकृष्णन पिल्लई यांनी चाणक्य नीती मधील रणनीती सामायिक करून, प्राचीन पद्धतीचे आधुनिक नेतृत्वात विलीनीकरण करून कार्यक्रमाला अधिक सखोलता दिली. एकंदरीत, मॅनेजमेंट कॉन्क्लेव्ह'२४ हे सिडनहॅम कॉलेजमध्ये मॅनेजमेंट एज्युकेशनमध्ये उत्कृष्टतेसाठी एक नवीन मानक स्थापित करणारे एक मोठे यश होते. हा कार्यक्रम त्याच्या धाडसी कल्पना आणि अविस्मरणीय अनुभवांसाठी स्मरणात राहाणारे आणि भविष्यातील नेत्यांना पुढील अनेक वर्षांसाठी प्रेरित करणारे ठरेल.

**माध्यम प्रायोजक दै.प्रहार**

# शासकीय महाविद्यालयात एमबीबीएसकरिता प्रवेश मिळणार

◆ **मुंबई (वार्ताहर) :**

युती शासनाच्या पाठपुराव्यामुळे राज्यात नवीन ८ वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी मिळाली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या एक वर्षात विक्रमी कामगिरी केली असून यांच्या मंत्री कालावधीत मुंबई, नाशिक, गडचिरोली, अमरावती, वाशिम, जालना, बुलडाणा, अंबरनाथ, भंडारा, हिंगोली असे एकूण १० वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी मिळाली आहे. या आठ महाविद्यालयात एकूण ८०० विद्यार्थ्यांना एमबीबीएसकरीता प्रवेश मिळणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा शासनाचे धोरण आहे. आता राज्यात एकूण ३५ वैद्यकीय शासकीय महाविद्यालय आहेत. आता वर्षाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून ४८५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. राज्यातील अनेक विद्यार्थी विविध देशांमध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जात होते. आता राज्यातच विद्यार्थी संख्या वाढल्याने विद्यार्थी राज्याचा शिक्षण घेऊ शकतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणामुळे तसेच केंद्रीय आरोग्य मंत्री, राज्यमंत्री यांच्यातही सहकार्यामुळे राज्यात कमी कालावधीत एव्हढ्या मोठ्या प्रमाणात वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचा पाठपुराव्यामुळे राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली. या १० महाविद्यालयांच्या बांधकामाकरिता व इतर आवश्यक साधनसामुग्रीसाठी प्रत्येक महाविद्यालयास ४०३ कोटी उपलब्ध करून देण्याचा राज्यशासनाने निर्णय घेतला आहे.

## ड्रेनेजमध्ये पडून महिलेच्या मृत्यूप्रकरणी मेट्रो, कॉन्ट्रॅक्टरच जबाबदार

**मुंबई :** अंधेरी पूर्व येथे उघड्या ड्रेनजमध्ये पडून एका ४५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला होता. सदर घटनेमुळे मुंबईकरांनी संताप व्यक्त केला होता. हा निष्काळजीपणामुळे गेलेला जीव होता. प्राथमिक तपासणीत मेट्रो प्रशासन जबाबदार असल्याचे समोर आले होते. आता या दुर्घटनेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉपोरेशन लिमिटेड आणि त्याच्या कॉन्ट्रॅक्टरला जबाबदार धरले आहे. सदर दुर्घटनेनंतर याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीचे प्रमुख महापालिका उपायुक्त देविदास क्षीरसागर तसेच या समितीमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर होते. या समितीने समितीने आपल्या अहवालामध्ये मेट्रो प्रशासनाला आणि कॉन्ट्रॅक्टरला जबाबदार धरले आहे.

# चैत्यभूमीवरील महापरिनिर्वाण दिनाची पूर्वतयारी; मंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

◆ **मुंबई (वार्ताहर) :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येत असतात. या अनुयायांना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांच्या पूर्वतयारीचा आढावा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वतयारीबाबत आढावा बैठक आठवले यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त प्रशांत



सपकाळे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री आठवले म्हणाले की, चैत्यभूमी येथे अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मुंबई महापालिका, गृह विभाग व सामाजिक न्याय विभाग तसेच सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाने दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी.चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायींना उच्च दर्जाच्या सुविधा पुरवाव्यात, अशा सूचना मंत्री केसरकर यांनी दिल्या. चैत्यभूमी तसेच शिवाजी पार्ककडे येणारे रस्ते व त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण, सुरक्षाव्यवस्था, अनुयायांकरीता पिण्याचे पाणी, शौचालय आदींची सुविधा, परिसर स्वच्छता, सीसीटीव्हीची व्यवस्था, विद्युतव्यवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची सादरीकरणाद्वारे माहिती यावेळी देण्यात आली.


## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

# ‘माझी लाडकी बहीण’ लाभाच्या रकमेत कपात केली, तर कारवाई होणार

◆ **मुंबई (वार्ताहर) :**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ दरमहा पात्र महिलांना देण्यात येत आहे. या लाभातून काही बँकांकडून मिनिमम बॅलन्स, ईसीएस मँडेट रिटर्न, चेक रिटर्न यासारखे शुल्क आकारून महिलांच्या बँक खात्यातील लाभाची रक्कम कपात करून घेतली जात आहे. अशा बँकांवर कारवाई करण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेबद्दल आज मंत्रालयात




राज्यस्तरीय आढावा बैठक (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे) घेण्यात आली. या बैठकीला महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास योजनेचे आयुक्त कैलास पगारे,सर्व जिल्ह्यातील महिला व बालविकास अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. काही पात्र महिलांच्या बँक खात्याला आधार सिडींग नसल्याने लाभ मिळत नाही. याबाबत अंगणवाडी सेविका,मदतनीस यांच्या मदतीने दि. २ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी. बँकेशी संबंधित अडचणी संदर्भात स्थानिक पातळीवर बैठका घ्याव्यात, अशा सूचनाही मंत्री आदिती तटकरे यांनी बैठकीत उपस्थित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना दिल्या. नांदेड जिल्ह्यात प्रत्यक्षात अर्ज भरताना लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरले आणि पुरुषांचे आधार क्रमांक, अकाउंट नंबर दिले गेले त्यामुळे पुरुषांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करून ज्या केंद्रांवर हे अर्ज भरलेगेले त्या केंद्र चालकाविरुद्धही गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही यावेळी मंत्री कु. तटकरे यांनी दिले.

आतापर्यंत २ कोटी ४० लाख महिलांची नोंदणी झाली असून १ कोटी ८७ लाख पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे. उर्वरित अर्जांची पडताळणी तातडीने करून घ्यावी, अशा सूचनाही मंत्री तटकरे यांनी यावेळी दिल्या.

# मोहन ये बात कुछ ठीक नहीं!

## नागरिक एवढी पातळी घसरली,लाजा सोडून दिल्या वाटतं?



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
राजकारण म्हणजे समाजसेवेचे पवित्र व्रत आहे तशी त्याची ओळख आहे बीड जिल्ह्यात माजलगाव मतदार संघाला सुसंस्कृत राजकारण्यांची एक मोठी परंपरा आहे पण सध्याची परिस्थिती बघता नव्याने आमदारकीची स्वप्ने पाहणारे मनातील आमदार यांनी राजकीय संस्कृती विसरून अत्यंत शेलकी भाषा उपस्थितासमोर वापरून आपल्या राजकीय विकासाचे अज्ञान दाखवले मुळात या मतदार संघात सुसंस्कृत मतदार आहे आणि दादा ची भाषाच त्यांना या विधानसभेच्या रिंगणातुन बाद करणारी आहे त्यामुळे मेळावा जरी मोठा केला तरी मतदार मात्र शून्य केला अशीच काहीशी गत मोहन जगताप यांची झाली आहे.

माजलगाव मतदार संघात स्व.सावळाराम त्रिभुवन,स्व. गोविंदराव डक,सुंदरराव सोळंके,मोहन सोळंके,राधाकृष्ण होके पाटील,बाजीराव जगताप,प्रकाश सोळंके,आर.टी.देशमुख यांनी एक सुसंस्कृत पातळीवर आपले राजकारणात मतदारसंघात केले त्यातून समाजसेवा केली मुळात नेता म्हणून घेताना काही आदर्श असावे लागतात पण उतावीळपणे केवळ पैश्याच्या जोरावर आपली बुद्धी पाजळून मी कसा आहे ? हे जगजाहीर करणे सुसंस्कृत मतदारांना काही पचनी पडलेले दिसले नाही मुळात जमलेल्या गर्दीत महिला ही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या त्यांच्या समोर आपली जीभ घसरून घेऊन जमलेल्याच मतदारांना दूर करण्याचे काम यावेळी मोहन जगताप यांच्या बोलण्याने झाले .मी दारू कधी कधी पितो या वाक्यातून मतदार संघातील तरुणांनी तुमच्या कडून काय आदर्श घ्यावा अश्या चर्चाच चौकात सुरू झाल्या आहेत मी लई मोक्कार...... यातून तरुणांनी पान २ वर...

### तुम्ही दारू पिता मग आम्ही आदर्श कोणाचं घ्यायचा ?

नेता म्हणलं की तो तरुणांचा आदर्श असतो,त्याचे आचार त्याचे विचार मानणारे युवक असतात त्याच्यासारखा मी पण झालो पाहिजे ही तरुणांनाची मानसिकता असते मग जर नेताच म्हणत असेल मी दारू पितो तर मग मतदारसंघातील युवकांनी आदर्श तरी कोणाचा घ्यायचा याचे उत्तर मोहन दादा तुम्ही च द्या.

### मी मोक्कार....

दादा तुम्ही आमदार होण्याचे स्वप्न उराशी बाळगत आहेत असे असताना तुमच्या तोडून सुसंस्कृत भाषा मतदार राजा समोर येणे गरजेचे आहे तुम्ही जाहीर भाषणात जर मी मोक्कार म्हणत असाल तर मतदार तुम्हाला काय म्हणून आपला लोकप्रतिनिधी म्हणून मिळवेल.

# जरंडीत स्वच्छता अभियान पंधरवाडा!

**धोरण:** जयंतीनिमित्त राबविलाउपक्रम



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
मराठवाड्यात आदर्श ठरलेल्या जरंडी ग्रामपंचायत च्या वतीने बुधवरी गांधी जयंती निमित्ताने ता.१७ सप्टेंबर ते ता. २ आगस्ट पर्यंत आयोजित स्वच्छता हीच सेवा या पंधरवड्याचा स्वच्छता करून समारोप करण्यात आला यावेळी गाव स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करण्यात आला होता.

जरंडी गावात सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पान २ वर...

### स्वच्छ माझे अंगण अभियान प्रारंभ

दरम्यान जरंडी ग्रामपंचायत चया वतीने बुधवरी गांधी जयंती च्या निमित्ताने स्वच्छ भारत मिशन टप्पा क्र दोन अंतर्गत स्वच्छ माझे अंगण अभियान सुरू करण्यात आले यावेळी उपसरपंच संजय पाटील यांच्या हस्ते सहभागाचे प्रमाण पत्र वितरण करण्यात आले.

# महापुरुषांचा अवमान तरीही कारवाई नाही?

**संतप्त:**मुंदडा कुटुंबियांच्या विरोधात आंदोलन




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा अक्षय मुंदडा यांच्या विरोधात अर्ज केला आहे थोर महापुरुषांच्या बाजूला फोटो लावून अवमान केल्यामुळे कारवाई होत नसल्याने उपोषन करण्यात आले आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की वरील विषयी अनुसुरून निवेदन करतो कि ४ दिवस झाले माझा अर्ज घेवून अजून चौकशी कार्यवाही तपासणी जोगाईवाडी सरपंच उपसरपंच व नंदकिशोर मुंदडा अक्षय मुंदडा यांच्या विरोधात अर्ज केला आहे थोर महापुरुषांच्या बाजूला फोटो लावून अवमान केल्यामुळे त्यांचा व सर्व देश वासियांचा अपमान/अवमान केला आहे. त्यांच्यावर ॲट्रासिटी अक्ट नुसार गुन्हा नोंदवावा म्हणून तक्रार दिलेली आहे. शहर पो.स्टे. अंबाजोगाई अद्याप पर्यंत कोणीतीही कार्यवाही न केल्यामुळे २ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंतीचा दिवशी लाक्षणिक उपोषण करणार गांधीजीनी देशात लोक शाही आणली सर्वांना समान न्याय मिळावा म्हणून इंग्रजाना भारतातून हाकलले त्यामुळे हुकुमशाही संपुष्टात येवून लोकशाही निर्माण झालेली असताना पोलिस प्रशासन आमदारचे सासरे व पती व इतर यांच्या वर पान २ वर...

# ...नसता उमेदवारांना गावबंदी

**भूमिका:** प्रशांत वासनिक यांचे आंबेडकरी जनतेला आवाहन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड रेल्वे स्टेशनला, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आहे. या नावाची केंद्राने नोंद करुन घ्यावी. अशी मागणी घेवून आंबेडकरी जनता पाठपुरावा करत आहे. दरम्यान बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी संभाव्य उमेदवारांनी तसेच नेत्यांनी प्रशासनास निवेदन दिल्याची प्रत दाखवावी नसता आंबेडकरी जनतेकडून गावबंदी करण्यात येईल.असे प्रसिद्धी पत्रक प्रशांत वासनिक यांनी काढले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्यामुळे संभाव्य उमेदवार मताचा जोगवा मागत फिरत आहे. आंबेडकरी जनतेने या उमेदवारांकडून बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन दिल्याची खात्री करावी नसेल तर त्यांच्याकडून त्यासंबंधीचे निवेदन घ्यावे. नसता त्यांना आंबेडकरी जनतेने गावबंदी घालावी. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांच्याच पिढ्यांचं पान २ वर...

# गेवराई विकासात आ.आण्णांचे प्रमाणिक प्रयत्न

**शिवराज पवार :**१६ कोटी ९६ लाखाच्या रस्ता कामाचे उदघाटन



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी
दहा वर्षांपूर्वी मतदारसंघातील कोणत्याही गावाला जाण्यासाठी साधा रस्ता नव्हता पण मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत मतदारसंघात राजकीय परिवर्तन घडवले तेव्हापासून आ.लक्ष्मण आण्णांनी मतदारसंघातील प्रत्येक गाव हायवेशी जोडुन ग्रामीण भागातील दळवळणाचा मार्ग सुकर होईल यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले आहे आ.लक्ष्मण आण्णांनी केलेला पारदर्शक विकास जनता विसरणार नाही असा विश्वास युवानेते शिवराज बाळराजे पवार यांनी व्यक्त केला आहे

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुर झालेल्या रस्ता कामांचे आज २ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता तळेवाडीत शिवराज बाळराजे पवार यांच्या हास्ते उद्घाटन संपन्न झाले यावेळी ह.भ.प.विष्णु महाराज भारती, प्रकाश सुरवसे,राहुल खंडागळे, शाम कुड, सरपंच बाळु यमगर,अंभियंता नितीन वीर, उपसरपंच पान २ वर...

# बीड रेल्वे स्टेशनला बाबासाहेबांचेच नाव राहील

**आक्रमक :** वंचितचे गेवराई प्रशासनास निवेदन



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी
नव्यानेच तयार होत असलेल्या बीड रेल्वे स्टेशनला अनेक आंबेडकरी अनुयायी चळवळीतील कार्यकर्ते सामाजिक संघटणांनी एकत्र येत बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे बॅनर लावुन त्या स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वानुमते नाव देण्यात यावे अशी मागणी केली त्याच अनुशंगाने गेवराई तालुका वंचित बहुजन आघाडीच्यावतिने तालुकाध्यक्ष अजय कुमार (पप्पु) गायकवाड व बीड जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे आणि भिमराव (महाराज) चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तहसिलदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी व केंद्रीय रेल्वे मंत्री यांना निवेदनाद्वारे बीड येथील रेल्वे स्टेशनला पान २ वर...

# भक्तांकडून रस्ता दुरुस्तीची आस!

**दुर्लक्ष:** नवरात्रात दर्शनासाठी गर्दी; पण रस्ता खडतर

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
येथील एसटी बसस्थानकामागे पासोडी देवीचे मंदिर असून, या मंदिरात एरव्हीपेक्षा नवरात्र उत्सवात परिसरातील भाविक मोठ्या संख्यने दर्शनासाठी गर्दी करतात. परंतू देवीच्या दर्शनाची वाट मात्र भक्तांसाठी खडतर झाली आहे.

कडा येथील एसटी बसस्थानकाच्या मागे पासोडी देवीचे मंदिर असून, या मंदिरात पासोडी देवीचा तांदळा आहे. माहूरच्या देवीचे ठाणे असल्याचे जेष्ठ नागरीकांकडून सांगण्यात येते. याठिकाणी मंगळवारी आणि शुक्रवारी देवीच्या मंदिरात भाविक दर्शनाकरिता आवर्जुन येतात. तर नवरात्र उत्सवाच्या काळात येथे भाविकांची मोठी वर्दळ असते. येथील काका भालेराव हे पुजारी मंदिराची पान २ वर...



### वर्षानुवर्षे रस्त्याची दैना....

पासोडी देवीच्या मंदिराकडे जाणारा अवघ्या एक कि. मी. अंतराच्या रस्त्याची अनेक वर्षापासून अक्षरश: दैना झाली. देवीच्या दर्शनासाठी येणा–या भाविकांची गैरसोय नित्याचीच आहे. त्यामुळे आता साक्षात देवीलाच पुढारी भक्तांकडून रस्ता दुरुस्तीची आस लागली आहे.

# संगणक जीवनाचा अविभाज्य घटक

**गशिअ यादव :**संगणक साक्षर काळाची गरज



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
संगणक हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला असल्याने प्रत्येकाने संगणक साक्षर होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आष्टीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी केले.आष्टी येथील मदरसा इस्लामिया दारुल उलूम, जामा मस्जिद, मोगलपुराच्या संगणक कक्षाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना यादव म्हणाले की सन: १९८५ मध्ये नव्यानेच आलेल्या संगणकाचा आकार मोठा होता. मात्र आज २०२४ मध्ये टेबलावरचा संगणक हातातल्या स्मार्ट वॉचमध्ये परिवर्तित झाला. संगणकाच्या युगातील मोठी क्रांती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये बदल घडवून संगणक साक्षर होणे ही काळाची गरज असून, बँका, दुकाने, शाळा, रुग्णालये आणि रेल्वे अशा पान २ वर...

## भास्कर रोडे, सचिन कागदे मंत्री आठवलेंच्या सत्काराला उपस्थित रहावे

# बीडमध्ये उसळणार रिपाइंचे निळे वादळ!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भव्य दिव्य रॅली सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी दुपारी ३:३० वाजता बीड शहरातील राजुरीवेस पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.



केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य सत्कार सोहळ्यात व बीड शहरात काढण्यात येणाऱ्या भव्य दिव्य रॅलीत परळी तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, महिला, गायरान धारक ,क्रियाशील सदस्य, सर्कल प्रमुख व रिपाइं कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने सामील होऊन निळ्या झेंड्याचे शक्ती प्रदर्शन करावे. असे आवाहन रिपाइंचे राज्य सचिव भास्कर रोडे, सचिन कागदे, प्रा. डी. जी. वाघमारे, दासू वाघमारे, दशरथ शिंदे, शरण मस्के, कार्तिक कांबळे, भीमा पौळ, यशपाल मुंडे, महादू गवारे, शाहेद खान, आदर्श मस्के आदींनी केले आहे.

# तंबाखू वेसनमुक्तीचा केला संकल्प!

**धोरण:** जीवाचीवाडी येथे जयंती साजरी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज तालुक्यातील जीवाची वाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त साजरी साजरी करण्यात आली यावेळी तंबाखू वेसन मुक्तीची शपथ घेण्यात आली.ग्रामविकास अधिकारी महिंद्र मुंडे यांनी दोन्ही प्रथिमेचे पूजन करून पुष्प वाहून श्रीफळ फोडण्यात आले या कार्यक्रमास माजी सरपंच महादेव चौरे,भाजपा नेते श्रीराम कुटे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माऊली चौरे,मुख्याध्यापक गोकुळ सारूक,मुकिंदा चौरे, कृष्णा चौरे,गणेश चौरे,सुभाष सारूक,बाबासाहेब चौरे, अभिमान चौरे,जयसिंग कुटे, चंद्रकांत फुंदे बिबीशन चौरे ग्रामपंचायत कार्यालयाचे कर्मचारी हनुमंत कांबळे नारायण शिंदे इत्यादी उपस्थित होते तसेच जिवाची वाडी येथील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयात माहात्मा गांधी जयंती साजरी.रोजी केज तालुक्यातील कै. श्रीरंगदासजी भुतडा सार्वजनिक ग्रामिण वाचनालय,जिवाची वाडी शासन मान्य ग्रंथालयात माहात्मा ग्रांधीजी यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी जिवाची वाडी ग्रामपंचात कार्यालयाचे ग्रामविकास अधिकारी महिंद्र मुंडे,ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ सारूक,भाजपा पान २ वर...